रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १५४
www.ramprahar.com
गुरुवार, २१ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'सर्वांचे मत घेऊनच जातनिहाय जनगणनेबाबत निर्णय'/२
उरण विधानसभा मतदारसंघात विकासाची गंगा/३
कराटे चॅम्पियनशिपमध्ये महाडमधील मुलांचे सुयश/८

## देशाविरोधात बोलल्यास शिक्षा; मॉब लिंचिंगला फाशी!



**नवी दिल्ली** : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी (दि. २०) लोकसभेत भारतीय न्याय संहिता (द्वितीय सुधारणा) (एनबीएस-२०२३), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (द्वितीय सुधारणा) (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष अधिनियम (द्वितीय सुधारणा) (बीएस-२०२३) अशी तीन विधेयके सादर केली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी तीनही विधेयक मंजूर झाल्याचे जाहीर केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विधेयक सादर करताना सांगितले की, यापुढे राजद्रोह कलमाची जागा देशद्रोह कलम घेणार आहे. सरकारवर कुणी टीका करतो शकतो, मात्र जो देशाच्या सुरक्षेला, अखंडतेला बाधा पोहचवणारे कृत्य किंवा भाष्य करेल, तो या कलमान्वये गुन्हेगार असेल, तसेच मॉब लिंचिंग प्रकाराला गुन्ह्याच्या कक्षेत आणून फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

# दूषित वायू सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करावी

### तळोजा औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषणाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले लक्ष

**नागपूर, पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील अनेक कारखान्यांतून होणाऱ्या वायू प्रदूषणाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि. २०) लक्षवेधी सूचनेद्वारे शासनाचे लक्ष वेधले, तसेच दूषित वायू सोडणाऱ्या कारखान्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचनेत म्हटले की, पनवेलच्या तळोजा औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्यांमार्फत रात्री तसेच पहाटेच्या वेळी सोडण्यात येणाऱ्या रासायनिक वायूमुळे पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, कामोठे, खारघर परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून ही बाब वारंवार शासनाच्या निदर्शनास आणूनसुद्धा दुर्लक्षामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे अनेक नागरिक आपली घरे सोडून अन्यत्र स्थलांतरीत होत असून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची या कारखान्यांबरोबर मिलीभगत असल्याची भावना त्यांच्यामध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे दूषित वायू सोडणाऱ्या कारखान्यांवर तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची गरज असून याबाबत शासनाने उपाययोजना करावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या सूचनेवर दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले की, तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये ४०५ प्रदूषणकारी उद्योग कार्यरत आहेत. या उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे उद्योग स्थापन करणे व चालवण्यासाठी ठराविक कालमर्यादेसाठी संमतीपत्र दिले जाते. यामध्ये हवा व जल प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक ती सयंत्रणा उद्योगांकडून बसविण्यात आले आहे की, नाही हे तपासले जाते. (पान २ वर..)




# सिडकोच्या ४६१ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार भूखंड

### आमदार महेश बालदी यांनी प्रकल्पग्रस्तांचा आवाज केला बुलंद

**नागपूर, पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या ४६१ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंडाचे वाटप करण्याच्या अनुषंगाने प्राधान्याने जागा उपलब्ध करून देण्यात येईल, असे रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी (दि. २०) सभागृहात आमदार महेश बालदी यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना आश्वासित केले.

नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी लक्षवेधी सूचना आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार अमित साटम व आमदार मनिषा चौधरी यांनी दाखल केली होती. त्या अनुषंगाने बुधवारी (दि. २०) सभागृहात लक्षवेधी सूचना आमदार महेश बालदी यांनी उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले.

नवी मुंबई प्रकल्पाकरिता सिडको प्रशासनाने ९५ गावातील शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनी १९८० साली संपादित केल्या आहेत. लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांच्यामुळे १२.५ टक्के भूखंड प्रकल्पग्रस्तांना देण्याचा आदर्शवत असा निर्णय झाला. सिडकोने विकसित केलेल्या क्षेत्रात संपादित जमिनीच्या १२.५ टक्के जमिन देण्याचा शासनाचा निर्णय झाला होता. हा निर्णय होऊन जवळपास २५ ते ३० वर्षांचा कालावधी होऊनही सिडकोने करंजाडे, द्रोणागिरी नोड येथील अद्यापपर्यंत जवळपास ४६१ प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंडाचे वाटप केले नाही.

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्यासाठी भूखंड शिल्लक नसल्याचे कारण सिडको प्रशासन देत असून दुसरीकडे चाणजे, मातिवली, बेलोंडाखार येथील अविकसित क्षेत्र खरेदी केलेल्या नवी मुंबई येथील बिल्डरांना व व्यावसायिकांना आर्थिक लाभासाठी उलवे येथे तातडीने शासनाच्या नवीन परिपत्रकाप्रमाणे २२.५० टक्के भूखंडाचे वाटप करीत आहे. (पान २ वर..)

## लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीतर्फे १३ जानेवारी २०२४ रोजी लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त जासई येथे अभिवादन व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत चर्चेसाठी बुधवारी (दि. २०) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव राजेश गायकर, खजिनदार विनोद म्हात्रे, गावठाण संघर्ष समितीचे समन्वयक राजाराम पाटील, कामगार नेते महेंद्र घरत, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, अर्थतज्ज्ञ जे. डी. तांडेल, लोकनेते दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, तसेच विजय गायकर, सीमा घरत, कटेकर आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

## मोहम्मद शमीसह २६ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



राष्ट्रीय खेळ पुरस्कारांची बुधवारी (दि. २०) घोषणा करण्यात आली. सर्वात प्रतिष्ठेचा ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार हा सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी या बॅडमिंटन जोडीला मिळाला आहे, तर वर्ल्डकप २०२३मधील कामगिरीनंतर आयत्या वेळी शिफारस झालेल्या मोहम्मद शमीला अर्जुन पुरस्कार देण्यात आला आहे. हे सर्व राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार ९ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रपती भवनात आयोजित एका कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिले जाणार आहेत.

(सविस्तर वृत्त पान ८ वर..)



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उरण तालुक्यातील धुतूम येथील शेमटीखार शेतकरी श्रमिक कल्याणकारी सामाजिक संस्थेला सात लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. संस्थेच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष विनोद ठाकूर, उपाध्यक्ष रेश्मा ठाकूर, खजिनदार विनोद घरत, सल्लागार रोशन ठाकूर, सदस्य निलेश पाटील, राम पाटील आदी उपस्थित होते.**



## नवीन पनवेलमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करा -परेश ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून नवीन पनवेलला पाणीप्रश्न भेडसावत असून नवीन पनवेलचा पाणीपुरवठा तत्काळ सुरळीत करावा, या मागणीसाठी बुधवारी (दि. २०) महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली नवीन पनवेल सिडको कार्यालयाला धडक दिली.

या वेळी नवीन पनवेलचा पाणीपुरवठा तत्काळ सुरळीत न केल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशारा परेश ठाकूर यांनी दिला. यावर येत्या दोन ते तीन दिवसांत नवीन पनवेलचा पाणीपुरवठा सुरळीत केला जाईल, असे आश्वासन सिडकोचे कार्यकारी अभियंता भगवान गायकवाड यांनी दिले.

गेल्या अनेक दिवसांपासून नवीन पनवेलचा पाणीप्रश्न जटिल झाला असून पाण्यावाचून नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. याबाबत सिडकोकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणत्याही ठोस उपाययोजना केली जात नाही. त्यामुळे नागरिकांनी माजी स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी यांच्या निदर्शनास आणून त्यांनी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची भेट घेतली. याबाबत परेश ठाकूर यांनी सिडको कार्यालयाला सहकाऱ्यांसह धडक देऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. (पान २ वर..)

## आदिवासी बालिकेवर बलात्कार, हत्येप्रकरणी आरोपीला जन्मठेप

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील मळेघर आदिवासीवाडीवरील तीन वर्षीय बालिकेवर बलात्कार करून निर्घृण हत्या केल्याप्रकरणी आरोपी आदेश पाटील यास जिल्हा मुख्य न्यायाधीश अजय राजदेकर यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.



पेण तालुक्यातील मळेघर आदिवासीवाडीवरील तीन वर्षीय बालिकेवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. २० डिसेंबर २०२० ही घटना घडली होती. जिल्हा पोलिसांनी आरोपी आदेश पाटील याला अटक केली. आरोपी गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून अलिबाग येथे एका गुन्ह्यात शिक्षा भोगत होता. पॅरोलवर तो घरी आला असता त्याने हे कृत्य केले.

याबाबत अलिबाग जिल्हा न्यायालयात तीन वर्षांपासून खटला सुरू होता. जिल्हा मुख्य न्यायाधीश अजय राजदेकर यांच्या न्यायलायात या खटल्याची सुनावणी झाली. या खटल्यातील आरोपी आदेश पाटील याच्यावर दोष सिद्ध झाले. (पान २ वर..)



# सर्व घटकांचे मत घेऊनच जातनिहाय जनगणनेबाबत निर्णय-मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

जातनिहाय जनगणनेबाबत देशभरात सतत चर्चा सुरू आहे. विरोधी पक्ष सातत्याने जनगणना करण्याची मागणी करीत आहेत. याचदरम्यान, समाजातील सर्व घटकांचे मत घेऊन जातनिहाय जनगणनेबाबत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य असून येथील संस्कृती आणि परंपरा इतर राज्यांपेक्षा वेगळ्या आहेत. महाराष्ट्रात सर्व समाज आणि जाती एकत्र राहतात, एकत्र काम करतात आणि एकत्र सण साजरे करतात. त्यामुळे समाजातील सर्व घटकांचे मत जाणून घेतल्यानंतर जनतेच्या भावना लक्षात घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या रेशीमबाग येथे उपस्थित राहून संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या स्मृतीस्मारकाला भेट देऊन पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

स्मृती मंदिर परिसर हे एक आमच्यासाठी प्रेरणास्थान आणि स्फूर्तीस्थान आहे. येथे कामाची ऊर्जा मिळते. त्यामुळे येथे नतमस्तक व्हायला आलो. हे सेवा करण्याचे स्थान आहे. त्यामुळे समाजाची सेवा करण्याची प्रेरणा आम्हाला येथून मिळते. मला काय मिळेल? यापेक्षा मी देशासाठी आणि समाजासाठी काय करू शकतो? हा विचार घेऊन आम्ही येथून जात असतो, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेल्या अनेक योजना महाविकास आघाडीच्या काळात बंद करण्यात आल्या, त्या विकासाच्या योजना आम्ही सुरू केल्या आहेत. जनतेला सरकारच्या योजनाचा लाभ व्हावा त्यांच्यामध्ये सुख समृद्धी नांदावी. समाजाच्या शेवटच्या माणसाला सगळ्या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी आम्ही काम करीत आहोत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## अनाथ बालकांच्या कल्याणासाठी शासन प्रयत्नशील -मंत्री अदिती तटकरे

**नागपूर : प्रतिनिधी**

अनाथ बालके ही शासनाची जबाबदारी असून त्यांच्या कल्याणासाठी शासन विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्नशील असल्याचे महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधानसभेत सांगितले. जिल्हा नियोजन समितीमधील तीन टक्के निधी महिला व बालविकासासाठी राखीव ठेवण्यात येतो. याबाबत झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन हा निधी वापरण्यामध्ये अधिक सुलभता आणण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.



सदस्य बच्चू कडू यांनी अनाथ बालकांसाठी विविध योजना राविण्यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री आशिष जयस्वाल, रोहित पवार आदींनी सहभाग घेतला. शासनामार्फत अनाथांच्या आरक्षणासाठी त्यांची वर्गवारी करणे, उपलब्ध जागांच्या एक टक्का इतके आरक्षण देणे, अनाथांना मागासवर्गीयांप्रमाणे पर्सेंटाइल लागू करणे, शासकीय नोकरीमध्ये टायपिंग प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दोन वर्षांपर्यंत मुदत देणे, बाल न्याय निधीमधून उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करणे, पिवळी शिधापत्रिका देणे, १८ वर्षांवरील अनाथांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देणे आदी महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले असल्याचे मंत्री तटकरे यांनी सांगितले.

राज्यात सद्यस्थितीत ६४४७ अनाथांना प्रमाणपत्र वितरित केली आहेत तर ११५ अनाथांना शासकीय नोकरीमध्ये संधी मिळाली आहे. पिवळ्या शिधापत्रिकेच्या आधारावर अनाथांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ अनुज्ञेय होतो. बालगृहातून बाहेर पडावे लागलेल्या मुला-मुलींसाठी राज्यात सध्या मुलींचे एक तर मुलांची सहा अनुरक्षणगृहे कार्यरत असून यासाठीची मंजूर प्रवेशित क्षमता ६५० इतकी आहे. त्यापैकी जवळपास ५१४ जागा रिक्त आहेत. केंद्र शासनाच्या 'मिशन वात्सल्य' योजनेअंतर्गत या प्रवेशितांना दरमहा चार हजार रुपये इतका भत्ता देण्यात येतो, अशी माहिती मंत्री तटकरे यांनी दिली.

एकल महिलांना एका छताखाली लाभ देण्यासाठी मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण योजनेंतर्गत प्रयत्न करण्यात येत असल्याचेही त्यांनी या अनुषंगाने उपस्थित झालेल्या अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितले.

## वासांबेमध्ये आधारकार्ड शिबिराला प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे (मोहोपाडा) ग्रुप ग्रामपंचायतीतर्फे ग्रामपंचायतीच्या शिवांजली सभागृहात आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आधारकार्ड शिबिराचे उद्‌घाटन सरपंच उमा संदीप मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी ग्रामपंचायत सदस्या ताई पवार, दीपक कांबळे, प्रशाली खाने, स्वप्नाली मैदर्गीकर,सविता अगरवाल आदी उपस्थित होते.अनेक शासकीय /निमशासकीय कामांसाठी, बँकिंग /शैक्षणिक कामांसाठी आधार कार्ड गरजेचे झाले आहे. जन्मानंतर सहा महिन्यांनी आधार कार्ड काढता येते. या शिबिरासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंगळवारी (दि. १९) सकाळी १० :३० वाजल्यापासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत २९० जणांनी नोंदणी केली होती. कागदपत्रे पहाणे, फॉर्म भरणे, फोटो व बोटांचे ठसे घेणे,स्वाक्षरी घेण्यात अधिक वेळ जात असल्याने मंगळवारी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत ७४ जणांचे आधारकार्ड काम पुर्ण झाले. शिबिरामध्ये ज्यांचे आधारकार्डच नाही त्यांचे आधार कार्ड काढणे, आधार कार्डावरील नाव, पत्ता यामधील चूक दुरूस्त करणे, आधार कार्डाला मोबाईल नंबर लिंक करणे,सध्याचा फोटो आधारकार्डवर यावे आदी शिबिरात काम करण्यात आले.

या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून सायंकाळी ५:३० पर्यंत ७५ नागरिकांच्या आधार कार्डचे काम पुर्ण झाले.

## गव्हाण विद्यालयात मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये एमकेसीएलच्या वतीने इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेचा पेपर कसा सोडवावा याविषयी मेरिट कॉम्प्युटरचे काझीसर, काझीमॅडम, विश्वास मते यांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्य गोडगे, उपमुख्याध्यापक मंडले, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबूलाल पुना पाटोळे, जे. ई. ठाकूर, एम. के. घरत, उपस्थित होते. प्रास्ताविक बाबूलाल पूना पाटोळे यांनी केले. आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एमकेसीएलचे विश्वास मते यांनी इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांकरिता बोर्ड प्रश्नपत्रिका कशी सोडवावी.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यू.डी. पाटील यांनी केले तर आभार आर. ए. खेडकर यांनी मानले.



## रेल्वेच्या धडकेत कामगार ठार; एक जण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

खंडाळा बोरघाटातील मुंबई पुणे लोहमार्गावर कर्जत लोणावळा स्टेशन दरम्यान मंकी हीलजवळ दरड प्रवण क्षेत्रात लोखंडी जाळी लावण्याचे काम सुरू असताना रेल्वे ट्रॅक वरून जाळी वाहून नेणाऱ्या दोन कामगारांना मेल एक्स्प्रेसने धडक बसली. या अपघात एक कामगार गंभीर जखमी झाल्याने त्याला एमजीएम रुग्णालय पनवेल येथे दाखल करण्यात आले मात्र उपचार सुरू असताना गंभीर जखमीचा मृत्यू झाला.

सुमित परिहार असे मृत कामगाराचे नाव असून तो मूळचा काश्मीर येथील आहे. तर अरविंद सिग असे दुसऱ्या जखमी पेशंटचे नाव असून उपचार सुरू असुन पुढील उपचारासाठी पनवेल येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

खंडाळा घाटात पळसदरी ते खंडाळा अशा घाट क्षेत्रात मागील काही वर्षांपासून रेल्वे रुळावर डोंगर उतारावरुन मोठमोठे दगड व मातीचा मलबा कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. प्रसंगी रेल्वे पटरीचे, रेल्वे इंजिन, डबे यांच्यासह प्रवासी ही जखमी होत मोठे नुकसान झाले आहे. रेल्वे प्रशासनाने या घाट सेक्शन च्या ३० किमी अंतरावरील संभाव्य दरड प्रवण क्षेत्रातील कपारीवर लोखंडी जाळी बसविण्याचे काम सुरू असताना ही घटना घडली. घटनास्थळी ३० कामगार काम करीत होते पैकी दोन कामगार जाळी वाहतूक करताना समोरुन एक्स्प्रेस मेल येत असल्याचा अंदाज न आल्याने ही घटना घडली. हे कामगार ठेकेदारी वर काम करीत होते. ही घटना बुधवारी सायंकाळी घडली.

## दापोली पारगावमध्ये संत गाडगेबाबांची पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दापोली पारगाव येथील अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्युनियर कॉलेजमध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयाचे उपमुख्याध्यापक भरणुकेसर यांच्या अध्यक्षतेखाली इयत्ता बारावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या विभाग प्रमुख आर. आर कटकेमॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. यामध्ये गवळी सोनी विजय या विद्यार्थिनीने संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा परिचय आपल्या भाषणातून करून दिला.

या कार्यक्रमासाठी वडीतकेसर यांच्या मदतीने इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांकडून शालेय परिसराची स्वच्छता करून घेतली. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील ठाकूरमॅडम, गावंडमॅडम, नाईकमॅडम, हुद्दारमॅडम व खिराडेमॅडम या उपस्थित होत्या. दुपार सत्र सुरू झाल्यानंतर कॉलेजच्या प्राचार्या पुष्पलता ठाकूर यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमासाठी पी.एच. म्हात्रे यांचे सहकार्य लाभले.





## वीर वाजेकर कॉलेज परिसरात ओएनजीसीतर्फे वनीकरण

**उरण : वार्ताहर**

वीर वाजेकर कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज उरण येथे ओएनजीसी उरण प्लांटने सोमवारी (दि. १८) एनजीओ ग्रीन यात्रा यांच्या संयुक्त विद्यमाने वनीकरणाचा उपक्रम हाती घेतला.

ईडी-प्लांट मॅनेजर सुभोजित बोस यांनी पुढाकार घेतला आणि इतर व्हीसीसी सदस्यांसह जीजीएम प्रमुख अभियंता सेवा श्री. पुगलेंधी, सीजीएम हेड मेंटेनन्स बिक्रम सिंग एचएसई प्रमुख एस के आर्य, यांनी महाविद्यालयीन कर्मचारी आणि विद्यार्थी आणि ओएनजीसीच्या एचआर टीमसह सक्रिय सहभाग घेतला.



कार्यक्रमादरम्यान स्वयंसेवी संस्थेद्वारे एक जागरूकता प्रश्नमंजुषादेखील आयोजित करण्यात आली होती ज्यामध्ये विद्यार्थ्यांना मूळ वाणांची योग्य ओळख करून देण्यासाठी प्रोत्साहन आणि बक्षीस देण्यात आले. मियावाकी प्लांटेशन तंत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जपानी तंत्राने ४०० पेक्षा जास्त स्थानिक जातींच्या वनस्पतींची एकूण २००० रोपे कॉलेज कॅम्पसमध्ये ४०० चौ.मी.च्या घनदाट क्षेत्रात लावण्यात आली. हे क्षेत्र २ वर्षांच्या कालावधीत सुमारे ९० टक्के जगण्याच्या दरासह उच्च घनतेच्या शहरी जंगलात वाढेल.

वनीकरणाचा उपक्रम हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि स्थानिक जैवविविधता विकसित करण्यासाठी फायदेशीर ठरणार तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना संशोधनाच्या उद्देशाने मदत करेल आणि महाविद्यालय व्यवस्थापनाला त्यांची नॅक मान्यता सुधारण्यास मदत करेल.

पान १ वरून

## दूषित वायू सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करावी

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी उद्योगांना भेट देऊन यंत्रणा कार्यरत असल्याचे तपासले जाते व तसे न आढळल्यास त्यांच्यावर मंडळातर्फे हवा व जलप्रदुषण कायद्यांतर्गत कायदेशीर कारवाई केली जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास नोव्हेंबर व डिसेंबर-२०२३मध्ये नागरिकांकडून रात्रीच्या वेळेस वास येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून रात्रीच्या वेळी गस्त घातली जाते, तसेच सप्टेंबर ते डिसेंबर २०२३ मध्ये सतत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी केंद्र तोंडरे तळोजा व कळंबोली अहवालावरून हवेची गुणवत्ता खराब व अती खराब श्रेणीमध्ये आढळून आली नसल्याचे निदर्शनास आले आहे. हिवाळ्यात रात्रीच्यावेळी तापमानात होणारी घट यामुळे उत्सर्जित वायुंचे विसर्जन होण्यास अडथळा निर्माण होत असल्याने नजिकच्या परिसरात रासायनिक वास काहीवेळा जाणवल्याचे या कार्यालयाच्या रात्रीच्या गस्ती दरम्यान निदर्शनास आले आहे. तक्रारीच्या अनुषंगाने डिसेंबर २०२३मध्ये सेंट्रलपार्क सेक्टर-२१, खारघर येथे मोबाईल एअर मॉनिटरींग व्हॅनद्वारे हवेची गुणवत्ता मोजण्याचे काम ६ डिसेंबरपासून चालू आहे. या अहवालावरून हवेच्या गुणवत्तेमध्ये केमिकल घटकांचे प्रमाण विहित मर्यादेत असल्याचे तसेच हवा गुणवत्ता निर्देशांक हा मध्यम स्वरुपाचे असल्याचे निदर्शनास आले आहे.

राजीव सिन्हा यांनी लोकआयुक्तांच्याकडे २/०५/२०२२ रोजी हवा प्रदूषणाची तक्रार केली होती. लोकआयुक्तांच्या आदेशान्वये विशेष तपास पथकाची स्थापना करून त्यांनी तळोजा औद्योगीक वसाहत व बाजूच्या परिसरामध्ये हवेची गुणवत्ताची तपासणी केली, तसेच कंपन्याचे स्रोत निरीक्षण केले. याबाबतचा अंतिम अहवाल लोकआयुक्तांकडे सादर केला आहे. अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे तळोजा औद्योगिक वसाहतीत कार्यरत असलेल्या एकूण ६४ उद्योग तसेच महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, तळोजा विभाग यांना सुधारणा करण्याविषयी निर्देशित केले आहे.

लोकायुक्तांच्या आदेशान्वये तळोजा हवा प्रदूषणाबाबत प्रगती आढावा अहवाल तपासण्यासाठी देखरेख समिती गठीत करण्यात आली. जिल्हाधिकारी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कार्यकारी अभियंता एमआयडीसी, आयआयटीचे तज्ज्ञ सदस्य, पनवेल महानगरपालिका व सिडकोचे अधिकारी, पोलिस निरीक्षक तळोजा एमआयडीसी व उद्योजक संघटना हे या समितीचे सदस्य असून समितीची प्रथम बैठक डिसेंबर २०२३ च्या अंतिम आठवड्यात होणार आहे. खराब वास हा मुख्यत: हिवाळ्यात रात्री व पहाटे जाणवल्याच्या तक्रारी प्राप्त होतात. या अनुषंगाने सामाईक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेतून वाघवली खाडीत सोडण्यात येणाऱ्या प्रक्रियायुक्त सांडपाण्याच्या विल्हेवाटीची वेळ बदलून ती फक्त भरतीच्या वेळेत सोडण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला सूचित केले आहे. त्यामुळे रोडपाली, कळंबोली व कामोठे या परिसरात वास कमी होण्यास मदत होईल. ब्रोमीन हाताळणी उद्योगांना उत्पादनाची वेळ सकाळी ६ ते संध्याकाळी ६ अशी निश्चित करून संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे. फिश मील (खराब माशांवर प्रक्रिया करणारे उद्योग), सॉलवंट डिस्टिलेशन व हाताळणी, औषध निर्मिती उद्योग, किटकनाशक, रासायनिक खते निर्माण करणारे उद्योग यांना हवा प्रदूषणासंदर्भात उपाययोजना करण्याबाबत निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास फिश प्रोसेसिंग करणाऱ्या उदयोगांतून निर्माण होणारे सांडपाण्यावर सम्प-२ परिसरात अन एरोबीक बायोडायजेस्टर उभारण्याबाबत निर्देशित केले आहे. सामायिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या विल्हेवाटीचे ठिकाण हे तीन किमी पुढे वाढवण्याचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने हाती घेतले आहे व काम प्रगतीपथावर असून अशाप्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत, तसेच लोकायुक्तांकडे दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आरोग्य अधिकारी, पनवेल महानगरपालिका व तसेच वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय यांच्याकडून नजीकच्या रहिवाशांच्या आरोग्यावर झालेल्या परिणामाबाबतचा अहवाल मागविला होता. त्यांच्या अहवालानुसार तळोजा औद्योगिक वसाहतीतून निर्माण होणारे वायू व जल प्रदूषणामुळे सभोवतालच्या परिसरातील रहिवासी संकुल क्षेत्रातील लहान मुले प्रदुषणामुळे मृत होणे, लहान मुलांच्या वाढीवर परिणाम होणे या बाबतची नोंद रुग्णालयातील अहवालानुसार दिसून येत नाही, असे कळविले आहे.

## सिडको प्रकल्पबाधित ४६१ प्रकल्पग्रस्तांना मिळणार भूखंड

या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनी देऊन आपले रोजगाराचे साधन कायमस्वरूपी गमावले असून प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सिडको प्रशासनाने कोणतेही आरक्षण न ठेवल्यामुळे स्थानिक प्रकल्पग्रस्तांवर उपासमारीची वेळ आली आहे, त्यामुळे या विभागातील शेतकरी व नागरिकांमध्ये सिडको प्रशासनाच्या विरोधात प्रचंड चिड निर्माण झाली असून याबाबत शासनाने सिडको प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही व उपाययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार महेश बालदी यांनी सभागृहात केली.

या प्रश्नावर सभागृहात उत्तर देताना ना. उदय सामंत यांनी, सिडको प्रकल्पबाधित ४६१ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना १२.५ टक्के योजनांअंतर्गत भूखंडाचे वाटप करण्याच्या अनुषंगाने प्राधान्याने जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन आमदार महेश बालदी यांना दिले तसेच विकसकांना देण्यात येणाऱ्या भूखंडासंदर्भात उपस्थित केलेल्या शंकेच्या अनुषंगाने लेखी तक्रारी आल्यास त्यावर चौकशी करून योग्य ती कारवाई करणार असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली.

***जवळपास तीन दशके प्रलंबित असलेल्या या प्रश्नाला अधोरेखित करून प्रकल्पग्रस्तांचा आवाज आमदार महेश बालदी यांनी बुलंद केला. त्यामुळे या ४६१ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय व भूखंड मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.***

## लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

या बैठकीत लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमात लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीतर्फे घेण्यात आलेल्या गणपती आरास स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण तसेच दशरथ भगत यांच्यातर्फे नवी मुंबईमध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. यासोबतच अखिल आगरी परिषदेतर्फे विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. या सर्व कार्यक्रमांची रूपरेषा, नियोजन याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

## पेण आदिवासी बालिका बलात्कार, हत्याप्रकरणी आरोपीला जन्मठेप

सरकारी पक्षातर्फे ॲड. उज्ज्वल निकम यांनी बाजू माडताना आरोपीला फाशी द्यावी, अशी मागणी केली होती.

जिल्हा मुख्य न्यायाधीश अजय एस. राजदेकर यांनी या प्रकारणी बुधवारी (दि. २०) शिक्षा सुनावली. न्यायालयाने आरोपी आदेश पाटील यास भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणे तसेच भा.द.वि. कलम ३७६ (अ), ३७६ (अ) (ब), सह पोक्सो कायदा कलम ५ (एम) सह ६ प्रमाणे मा. न्यायालयाने अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तीला जिवे ठार मारल्याप्रकरणी आरोपीस दोषी मानून जन्मठेपेची शिक्षा व ५००० रुपये दंड, जर दंड भरला नाही तर आणखी सहा महिने कारावास अशी सुनावली. या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांना जिल्हा सरकारी वकील ॲड. भूषण साळवी सहाय्यक म्हणून काम पाहिले. पेण उपविभागीय पोलीस अधिकारी व्ही. व्ही. चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी जलदगतीने तपास पूर्ण केला.

## नवीन पनवेलमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करा -परेश ठाकूर

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, माजी प्रभाग समिती सभापती समीर ठाकूर, पनवेल शहर महिला मोर्चा अध्यक्षा राजश्री वावेकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. येत्या दोन ते तीन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करणार असल्याचे आश्वासन सिडको अधिकाऱ्यांनी दिले, मात्र आश्वासनाची पूर्तता न झाल्यास माजी स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे, असे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सांगितले.

# उरण मतदारसंघात विकासाची गंगा





## भाताण गावात १० कोटींची विकासकामे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील भाताण ग्रामपंचायतीमध्ये उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून तब्बल १० कोटींची विकास कामे होणार असून यामुळे भाताण ग्रामपंचायतीचा कायापालट होणार एवढ्या मोठ्या प्रमाणात या ग्रामपंचायतीच्या हद्दीत विकास कामे आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या सर्व कामांचे भूमिपूजन बुधवारी (दि. २०) पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

यामध्ये अजिवली हायस्कुल ते भाताण पाडा रस्त्यासाठी ७ कोटी ५० लाख रुपयांचा निधी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून देण्यात आला आहे. तर भाताण डीपीसी मधून भाताण पाडा येथे १५ लाख रुपयांचा निधी स्मशानभूमीसाठी, भाताण येथे तलाव संरक्षण भिंतीसाठी दोन लाख ८९ हजार रुपयांचा निधी, कैलास पाटील यांच्या घरापासून ते साईमंदिरापर्यंत आरसीसी गटारासाठी १० लाख रुपयांचा निधी, ग्रामपंचायत कार्यालया पासून ते किशोर भोईर यांच्या घरापर्यंत रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी १० लाख रुपयांचा निधी तसेच कैलास पाटील यांच्या घरापासून साईमंदिर पर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी १० लाख रुपयांचा निधी, ग्रामपंचायत कार्यलय ते किशोर भोईर यांच्या आरसीसी गटारासाठी १० लाख रुपयांचा निधी, भाताण तलाव येथे मंगल कार्यालयासाठी ५० लाख रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या वतीने बस स्टॅन्डची उभारणी करण्यात येणार आहे.



भूमिपूजनावेळी प्रवीण खंडागळे, अविनाश गाताडे, बबन मुकादम, हरेश केणी, अनंता सते, अनिल भोईर, गुरूनाथ खारके, सावळे सरपंच सुनील माळी, जगन्नाथ चव्हाण, पंचायत समिती माजी सभापती देविदास पाटील, प्रिया मुकादम, पंचायत समिती उपसभापती वसत काठावले, शाम ठोबंरे, रवी देसाई, गणेश अगिवले, संतोष पाटील, अरुण म्हसकर, नारपोली सरपंच दीपक पाटील, दीपक दुर्गे, महादू पाटील, तानाजी पाटील, बाळाराम मुकादम, रंजनी मुकादम,अरुणा गाताडे, रसिका भोईर, दीपक ठाकूर, उपसरपंच अरुण पाटील, अस्मिता काठावले, दत्तात्रेय ठाकुर, सुभाष भोईर, कमलाकर जुमारे, कृष्णा भोईर, अनंता काठावले, हरिशचंद्र जुमारे, नितीन पाटील, तुकाराम मुकादम, महेश घरत, मधुकर मुकादम, संतोष पाटील, संजय काठावले, स्वप्नील भोइर, किरण मुकादम, गणेश गाताडे, अनिल काठावले, विजय ठाकूर, नितेश भोईर, देवीदास पाटील, दीनकर पाटील, अशोक भोईर, एकनाथ ठाकूर, भरत ठाकुर, राम ठाकूर, शांताराम पाटील, वामन पाटील, कृष्णा खारके, राम भोईर यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# गाढी नदीच्या ब्रीजलगत रस्ता द्या

## देवद गामस्थांची सिडकोकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल ते देवद या गाढी नदीवर होत असलेल्या ब्रीजला देवद गावाच्या बाजूने वाहन योग्य रस्ता तयार करण्यात यावा, अशी मागणी देवद ग्रामस्थांनी सिडकोकडे पत्राद्वारे केली आहे. या रस्त्यासाठी ब्रीज परिसरात देवद ग्रामस्थांनी सिडको अधिकाऱ्यांसह पाहणी केली.

पत्रात म्हटले आहे की, मागील अनेक वर्षे आम्हा देवदवासीयांसाठी गाढी नदी पार करून पनवेल शहराकडे जाण्यासाठी पूल नाही. 'महाराष्ट्र जीवन प्राधिकरण' यांनी उभारलेल्या पाईपलाईनच्या सर्व्हिस पूलावरून आम्ही ये-जा करत आहोत. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे तसेच सिडको आस्थापनाकडून देवद गावासाठी गाढी नदीवर ब्रीज बांधण्यात येत आहे. त्याचे कामही वेगाने सुरू आहे.

ब्रीजचे काम मार्च – एप्रिल २०२४ पर्यंत पूर्ण होईल, असे आम्हाला कळले आहे, परंतु ब्रीज तयार झाला तरीही देवद गावात ये-जा करण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही. ब्रीजच्या कामासोबतच वाहतुकीच्या दृष्टीने देवद येथील ग्रामस्थांसाठी तातडीने देवद गावाच्या बाजूने योग्य रस्ता करून देण्यात यावा. पूल तयार होईल व रस्ता नाही अशी परिस्थिती ओढवू नये अशी आपण काळजी घ्याल अशी अपेक्षा आहे. या रस्त्याचे काम लगेच सुरू व्हावे अशी सर्व ग्रामस्थांची मागणी आहे.

दरम्यान, या रस्त्यांच्या जागेसाठी सिडकोचे अधिकारी गोसावी, सिडकोचे इंजिनीअर रायकर, माजी जि. प. सदस्य व भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, देवद गावचे सरपंच विनोद वाघमारे, उपसरपंच विजय वाघमारे, सनातन आश्रमचे प्रमुख अभयजी वर्तक, ग्रामपंचायत सदस्य दिनेश वाघमारे, संदीप वाघमारे, राम वाघमारे, संजय वाघमारे, बंटी रसाल, सनातन आश्रम घाडगील, ब्रिजच्या कॉन्ट्रॅक्टर आणि देवद येथील ग्रामस्थ अशा सर्वांनी मिळून सदर जागेची पाहणी केली. हा रस्ता तातडीने होणे गरजेचे आहे असे सर्वानुमते ठरले. आपण या कामी तातडीने लक्ष घालावे आणि रस्ता लवकरात लवकर बनवून देण्यात यावा, अशी मागणी सिडकोच्या अधिकारी गोसावी यांच्याकडे करण्यात आली.



# तुराडे येथे रस्ता काँक्रिटीकरणाचे लोकार्पण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील तुराडे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कष्टकरी नगर येथे उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या विकास निधीतून तयार करण्यात आलेल्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे लोकार्पण बुधवारी भारतीय जनता पार्टीचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून कष्टकरी नगर येथील बौद्ध वस्तीतील अंतर्गत रस्त्याच्या काँक्रिटीकरण करण्यात आले. या कामासाठी १० लाख रुपये येवढा खर्च आला असून बुधवारी लोकार्पण झालेल्या या रस्त्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय टळली आहे. याबद्दल गावकऱ्यांनी आमदार महेश बालदी यांचे आभार मानले.

या वेळी भाजपचे गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, पंचायत समिती अध्यक्ष सुनील माळी, सदस्य पूजा भोईर, धनश्री गायकवाड, भाजपचे तुराडे गाव अध्यक्ष प्रतीक भोईर, माजी उपसरपंच हर्षल पाठारे, सुजित पाटील, काका गायकवाड, परमेश राठोड, करण गायकवाड, राजू राठोड, मांगर्ष राठोड, प्रमोद खाणे, विजय गायकवाड, भानुदास गायकवाड, सचिन चव्हाण यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# गुळसुंदे येथे सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुळसुंदे येथे आमदार महेश बालदी यांच्या विकास निधी अंतर्गत सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या कामासाठी ४८ लाखांचा खर्च येणार असून सुसज्य असे सभागृह, नदीवरील घाट बांधण्यासाठी १२ लाख रुपयांचा निधी तर शंकर मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी ४४ लाख ५० हजारांचा निधी गुळसुंदे वासियांना देण्याचे काम आमदार महेश बालदी यांच्यातर्फे करण्यात आले.

या वेळी गुळसुंदे सरपंच सरपंच मिनाक्षी जगताप, उपसरपंच अरुणा पाटील, भाजपचे गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, पंचायत समिती अध्यक्ष सुनील माळी, सदस्य पूजा भोईर, धनश्री गायकवाड, भाजपचे तुराडे गावअध्यक्ष प्रतीक भोईर, माजी उपसरपंच हर्षल पाठारे, सुजित पाटील, काका गायकवाड, परमेश राठोड, करण गायकवाड, राजू राठोड, मांगर्ष राठोड, प्रमोद खाणे, विजय गायकवाड, भानुदास गायकवाड, सचिन चव्हाण, राजेश साठे, आर. डी. पाटील, संतोष चौलकर, शरद ठाकूर, मधुकर मोकळ, योगेश साठे, प्रथमेश पाटील, मनोज पवार, प्रशांत पाटील, मंगेश पाटील, शांताराम मालुसरे, गजानन वीर, जितू गाताडे, अशोक गायकवाड, पोलीस पाटील, प्रमोद विद्वान, वैभव भोईर, दीपक पारंगे, प्रकाश मोरे, बजरंग भागवत, वसंत गोळे, पप्पू मांडवकर, महेश पाटील, दीपाली जगताप, जितेंद्र पाटील, रमेश मालुसरे, रचना चव्हाण, आयत्या शिद, अपर्णा चौलकर, सतीश साठे, आशा वीर, काव्या जोशी, आकाश जोशी, रवी जोशी, बाळू जोशी आदी उपस्थित होते.



# सीकेटी विद्यालयात बालसभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल मधील, चांगू काना ठाकूर मराठी प्राथमिक विद्यालयात चौथीच्या विद्यार्थ्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनानिमित्त बालसभेचे आयोजन केले होते.

सर्वप्रथम स्वागत गीताने पाहुण्यांचे स्वागत झाले. बालसभेस नुपूर नरेंद्र गावडे व वेदांत सूर्यवंशी हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. पाहुण्यांनी विद्येची देवता सरस्वती देवीचे पूजन केले. त्यानंतर पाहुणे स्थानापन्न झाले.

या कार्यक्रमात जान्हवी काशीद, श्रावणी बडे व जैत्री म्हात्रे यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विषयी थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर समीक्षा चव्हाण, आराध्य जाधव, कैवल्य पवार व स्वरा रांबाडे यांनी गाणी म्हणून दाखविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया जानकर हिने केले. फलक लेखन मेंगाळसर यांनी केले, विजयश्री थळी यांनी बाल सभेच्या कार्यक्रमाचे नियोजन केले. अनुष्का आमले हिने उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.



# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये विज्ञान प्रदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि. २०) आंतरशालेय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात एकूण २९ विद्यालयांनी सहभाग घेतला होता. विज्ञान आणि वाणिज्य षाखेतून जवळपास ६३ प्रकल्प आले होते.

या प्रकल्पांची विभागणी एकूण तीन गटात केली होती. ए, बी आणि सी असे तीन गट होते. कार्यक्रमाच्या प्रमुखपदी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. गडदे, बोर्ड मेंबर संजय भगत, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी सर, भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, गायकवाड सर आदी मान्यवर उपस्थित होते.



या विज्ञान प्रदर्शनास गट ए गटासाठी आर राधाद्रुशणन आणि विजय नदार, गट बी साठी सी.पी.कौशिक आणि महेश धायगुडे तर गट सी साठी सत्यवान दलाल आणि आनंद सकले हे परीक्षक म्हणून लाभले.

विज्ञान प्रदर्शन स्पर्धेमध्ये गट ए मध्ये, प्रथम विबग्योर हायस्कूलला, व्दितीय क्रिस्ट अकॅडमीला, तृतीय रेडक्लिफ स्कूल उलवेला तर उत्तेजनार्थ पुरस्कार पी.व्ही.जी. स्कूल आणि लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेज कामोठेला मिळाले.

गट बी मध्ये, प्रथम क्रमांक आर.टी.पी.एस खारघर, व्दितीय क्रमांक सेंट जोसेफ हायस्कूल, तृतीय क्रमांक लोकनेते रामशेठ ठाकूर कामोठेला मिळाले. तर उत्तेजनार्थ पुरस्कार तिलक पब्लिक स्कूल आणि एम.एन.आर. स्कूल ऑफ एक्सलेन्स कामोठेला भेटले.

गट सी गटामध्ये, प्रथम क्रमांक डी.ए.व्ही. इंटरनॅशनल स्कूल, व्दितीय क्रमांक सेंट जोसेफ हायस्कूल, तृतीय क्रमांक एस.आय.ई.एस. ज्युनियर कॉलेज नेरूळला मिळाले तर उत्तेजनार्थ पुरस्कार एम.एन.आर स्कूल ऑफ एक्सलन्स, कामोठे आणि रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय यास मिळाले.

सदर कार्यक्रमास प्राचार्या निषा नायर, रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक खांदेकर सर यांचे मार्गदर्शन लाभले.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्याबद्दल भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील, रायगड जिल्हा संघटक डि. पी. सोनावणे, माजी नगरसेवक दशरथ भगत, ज्येष्ठ रंगकर्मी राजेंद्र वाडकर, श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अरुण घाग, प्रवक्ते शैलेश घाग, विनोद म्हात्रे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन केले.** (छाया : योगश पाटील)

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मुलाखती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि. २०) करियर गायडन्स, प्लेसमेंट सेल व एसपीआरके टेक्नॉलॉजीज खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या मुलाखती घेण्यात आल्या.

या मुलाखतीसाठी एसपीआरके टेक्नॉलॉजीचे पदाधिकाऱ्यांनी य विद्यार्थी व विद्यार्थिनींना एसपीआरके टेक्नॉलॉजीजमध्ये असलेल्या संधी तसेच निवड प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले व त्यांच्या अर्जाची छाननी करून मुलाखती घेतल्या त्यामधील दहा विद्यार्थ्यांची निवड केली. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या मुलाखतीचे आयोजन प्लेसमेंट सेल व करिअर गायडन्स समितीचे समन्वयक प्रा. रेवन शिंदे यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. महेश धायगुडे, प्रा. योगिता पाटील, प्रा. रूपाली नागरेकर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# 'सीकेटी'मध्ये पोस्टर आणि मॉडेल स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात बुधवारी (दि. २०) सायन्स असोसिएशन आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटी, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने पोस्टर आणि मॉडेल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेचे उद्घाटन मा. प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे यांनी उपस्थिती दर्शविली.

प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर व आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांनी पोस्टर आणि मॉडेल यांची पाहणी करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत वेगवेगळ्या विज्ञान शाखांचे ९४ पोस्टर आणि २७ मॉडेल आले होते आणि त्यातून प्रत्येक शाखेतून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तीन क्रमांक काढण्यात आले. त्याचबरोबर स्पर्धेतला भरघोस प्रतिसाद पाहून उत्तेजनार्थ क्रमांक काढण्यात आले. तसेच प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन कौतुक करण्यात आले.

## संपादकीय

# गोंधळलेले चेहरे

ममता बॅनर्जी यांनी धडाकेबाज सूचना करणे आणि त्याला 'इंडिया आघाडी'च्या बाकीच्या काही नेत्यांनी मान डोलावणे ही काही आपोआप घडलेली घटना नव्हे. गांधी परिवाराला पूर्णत: बाहेर ठेवण्याचा बेत या आघाडीत शिजू लागल्याचे हे लक्षण मानायला हवे. म्हणूनच बैठकीतील दोन्ही मागण्यांबाबत स्वत: मल्लिकार्जुन खरगे यांनी सावध भूमिका घेतलेली दिसते.

**येत्या वर्षात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका कुठल्याही क्षणी जाहीर होतील अशी चिन्हे दिसू लागली आहेत. राजकीय पक्षांचा तर धीर सुटू लागला आहे. कुठल्याही परिस्थितीत आगामी निवडणुकीमध्ये मोदी सरकारचा पुरता पाडाव केल्याशिवाय राहणार नाही अशा वल्गना करीत विरोधी पक्षांचे एक कडबोळे काही महिन्यांपूर्वीच स्थापन झाले. २८ पक्षांच्या या कडबोळ्याला 'इंडिया आघाडी' असे म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात अहंकार आणि घबराटीमुळे एकत्र आलेले हे सारे अपयशी, असंतुष्ट पक्ष आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या करिश्म्यापुढे यापैकी कोणाचाही निभाव लागणे शक्य नाही हे एव्हाना सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे. मोदी यांचा पाडाव एकट्याने नव्हे तर सगळ्यांनी मिळून करता येईल का असा स्वप्नवजा प्रश्न उराशी बाळगून हे पक्ष एकत्र आले आहेत. आजवर त्यांच्या चार बैठका झाल्या. पहिली बैठक पाटणा येथे झाली. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी या बैठकीचे आयोजन केले होते. पाठोपाठ दुसरी बैठक बंगळुरात झाली. तिसरी बैठक मुंबईतील पंचतारांकित हॉटेलामध्ये ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या यजमानपदाखाली पार पडली आणि चौथी बैठक दिल्लीतील अशोका हॉटेलमध्ये मंगळवारी झाली. या चारपैकी तीन बैठका आलिशान पंचतारांकित हॉटेलांमध्ये पार पडल्या. पाटण्यातील मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी बोलावलेली पहिली बैठक तुलनेने साधेपणाने पार पडली. या चारही बैठकींमधले निष्पन्न मात्र शून्य आहे. दिल्लीतील बैठकीत तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीच्या वतीने पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे नाव जाहीर करावे असा प्रस्ताव ठेवला. विशेष म्हणजे आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री व द्रमुकचे प्रमुख एम. के. स्टॅलिन यांनी त्यांच्या प्रस्तावाला दुजोरा दिला. याचवेळी, इंडिया आघाडीला कुणीतरी निमंत्रक असावा अशी सूचना उद्धव ठाकरे यांनी केली. खरगे यांचे नाव पुढे करण्यात आल्याने नितीशकुमार आणि लालुप्रसाद यादव हे दोघेही नाराज झाल्याचे कळते. याच बैठकीमध्ये ममता बॅनर्जी यांनी आणखी एक धमाकेदार सूचना केल्यामुळे काँग्रेसच्या गोटात चलबिचल झाल्याचे वृत्त काही हिंदी वृत्तवाहिन्यांनी झळकवले. राहुल गांधी यांच्या भगिनी प्रियांका गांधी यांनी वाराणसीमधून पंतप्रधान मोदी यांच्या विरोधात निवडणूक लढवावी अशी सूचना ममता दिदींनी केल्याचे सांगण्यात येते. पंतप्रधान पदाचा चेहरा म्हणून खरगे यांचे नाव पुढे केले जात असले तरी प्रत्यक्षात चित्र वेगळेच दिसणार हे वेगळे सांगायला नको. एक तर मोदी यांच्याशी तुल्यबळ असा नेता विरोधकांकडे नाही. विरोधकांकडेच कशाला, संपूर्ण भारतात मोदी यांच्या तोडीचे नेतृत्व सापडणे अशक्य आहे. इंडिया आघाडीचे कडबोळे निवडणुकीपर्यंत एकत्र राहिले काय किंवा फुटले काय, भारतीय जनता पक्षाला त्यामुळे काडीमात्र फरक पडणार नाही हे उघडच दिसते. जनतेच्या मनात घर करून असलेल्या मोदी यांचा पाडाव इंडिया आघाडीला अवघडच नाही तर अशक्य आहे.**

# पर्यटनक्षेत्र कुडपण विकासाच्या प्रतीक्षेत





**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यातील हिलस्टेशन कुडपण बुद्रुक येथे गेल्या १५ वर्षांपासून रस्ता बांधण्याचे प्रयत्न जोरदार सुरू झाल्यानंतर त्यापुढील शेलारांच्या कुडपणची वाटही सुकर करण्याचे प्रयत्न गेल्या १० वर्षांपासून युद्धपातळीवर सुरू झाले आहेत. शेलारांच्या कुडपणपर्यंत जाण्यासाठीच्या पुलाचे काम झाल्याने कुडपण बुद्रुक आणि खुर्द या दोन्ही गावांच्या पर्यटन विकासाचे प्रयत्न सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली होती, मात्र आता अद्यापही याबाबत कार्यवाही झालेली नाही.

तालुक्यातील कुडपण हे गाव इंग्रजांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार थंड हवेचे ठिकाण असल्याचे नमूद करण्यात आले. या गावाचे सुपुत्र नायक कृष्णा सोनावणे यांनी ब्रिटीशांच्या बॉईज कंपनीतून सैन्यात प्रवेश घेतल्यानंतर स्वतंत्र भारतातील सेनादलामधून पाकिस्तानी सैन्याची आणि कबाली घुसखोरांची दाणादाण उडविल्याबद्दल त्यांचा महावीरचक्र देऊन सन्मान करण्यात आला. त्या काळी जन्मगावी कुडपण येथे सेवानिवृत्तीनंतर राहून उर्वरित आयुष्य कंठणे तेथील भौगोलिक परिस्थितीमुळे केवळ अशक्य असल्याने त्यांनी येथे राहणे टाळले.

कुडपण येथे प्रस्तरारोहण करण्यासाठी येथील भिमाची काठी या दुर्गम सुळक्यावर चढाईसाठी बर्मा ब्रिज बांधून काही गिर्यारोहकही तीन-तीन दिवसांचे कॅम्प करीत असल्याचे चित्र पर्यटन विकासासाठी आशादायी ठरत आहे.

या परिसरातील लोकजीवन वारकरी संप्रदायाचे आणि काहीसे शिकारीचा शौक असलेल्या तरूणांचेही आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये आक्रमकता अंगी असूनही संयमी वृत्तीदेखील दिसून येते. एकीकडे क्षेत्रपाळजवळील रस्त्यासाठी तत्कालीन रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा माजी आमदार स्व. माणिकराव जगताप यांनी तत्कालीन राज्यमंत्री सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत कुडपण रस्त्याचा नारळ फोडला. दुसरीकडे गेल्या काही वर्षांपूर्वी माजी मंत्री प्रभाकर मोरे यांनी तत्कालीन रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा अपेक्षा कारेकर यांच्यामार्फत कुडपणला रस्ता करण्यासाठी भूमिपूजन केले.

दोन्ही रस्ते गेल्यावर्षी माती कामासह वाहतुकीला उपलब्ध झाले. पोलादपूरचे भूमिपुत्र आमदार असताना प्रवीण दरेकर यांनी कोकणचा अर्थसंकल्प राज्यभर विविध प्रतिक्रिया व्यक्त होत असताना अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान कुडपणच्या विकासाकडे दुर्लक्ष झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त करून राज्याचे लक्ष कुडपणकडे वेधले.

माजी पालकमंत्री आदिती तटकरे या पर्यटन राज्यमंत्रीही असल्यामुळे त्यांनी कुडपणचा पर्यटन विकास घडविण्यासाठी पाहणी दौरा केल्यानंतर त्यांनी तब्बल १० कोटींचा निधी जाहीर केला, परंतु मधल्या काळात झालेल्या काही राजकीय घडामोडींमुळे कुडपणच्या पर्यटन विकासाची वाट मंदावली. येथील भौगोलिक परिस्थितीमुळे दरडी-उसरे कोसळून वारंवार ठप्प झाले, मात्र आता पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत आता कुडपण रस्ता आणि कोंडूशी रस्त्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू झाले आहेत. तत्कालीन आमदार स्व. माणिकराव जगताप यांनी ज्याप्रमाणे ओंबळी रस्ता रत्नागिरी जिल्हा हद्दीपर्यंत विकसित केला. त्याप्रमाणेच त्यांनी कुडपण रस्ता पार-प्रतापगडपर्यंत जाणारा असा सातारा जिल्हाहद्द म्हणून विकसित करण्याचा निर्धार केला, मात्र दरम्यानच्या निवडणुकामुळे झालेल्या राजकीय स्थित्यंतराने या कामाची गती मंदावली आणि दिशाही बदलली असल्याचे जाणवू लागले आहे.

कुडपण बुद्रुकमध्ये धनगरवाडी, पहिले कुडपण आणि मधले कुडपण यांचा समावेश असून कुडपण खुर्दमध्ये शेलारांचे कुडपण ही मोठी लोकवस्ती आहे. शेलारांच्या कुडपण येथे स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी होत आहे. हिलस्टेशन म्हणून विकसित झालेल्या भागापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शेलारांच्या कुडपणपासून कोंडूशीच्या रस्त्याचा प्रश्न आता दृष्टीपथामध्ये येऊ पाहात आहे. शेलारांच्या कुडपणकडे प्राथमिक शाळा आहे. सद्गुरू अरविंदनाथ महाराजांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनामुळे उत्तम गावगाडा चालतोय, मात्र रस्ता नसल्याने अनारोग्य व अपघातप्रसंगी आजही फारच अडचण निर्माण होत आहे.


कुडपणच्या दुर्गमतेमुळे येथील माध्यमिक विद्यालय महाड तालुक्यातील एमआयडीसीमधील सवाणे गावात स्थलांतरीत करण्यात आले आहे. कुडपण बुद्रुकपर्यंत असलेली एसटी प्रवासी सेवा कुडपण खुर्दपर्यंत पोहचली आहे. पावसाळ्यात ही प्रवासीवाहतूक बंद ठेवण्यात आल्याने विद्यार्थ्यांना खासगी जीपद्वारे गोळेगणीच्या माध्यमिक विद्यालयापर्यंत पोहचवून घरापर्यंत परत नेण्यासाठी काही दानशूर मंडळींना पुढाकार घ्यावा लागला होता. निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केली असताना राज्यसरकारने रस्त्याबाबत लक्ष दिल्यास कुडपणची पर्यटनविकासाची वाट सुकर होऊ शकणार आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# सॅमसंग स्मार्टफोनच्या सुरक्षेसाठी नवीन सिक्युरिटी फिचर

सॅमसंग गॅलेक्सी स्मार्ट फोनने त्यांच्या OneUI या अँड्रॉईड व्हर्जनच्या नवीन अपडेटवर काम केलेले दिसते. अँड्रॉईड १४ OSच्या अनेक नवीन फिचर्स, क्विक सेटिंग पॅनल्स आणि यामधील अनेक दुरुस्त्या लक्षात घेता या कंपनीने नुकतेच OneUI ६ हे नवीन अपडेट आणलेले आहे. या नवीन OneUI ६ अपडेटसह सॅमसंगने अनेक नवीन सिक्युरिटी फिचर्सदेखील आणले आहेत, ज्यामुळे सॅमसंग गॅलेक्सीचे स्मार्ट फोन्स अँड्रॉईड १४ वरदेखील अगदी सुरळीत चालतील आणि अधिक सुरक्षितसुद्धा असतील, असे समजते. या सिक्युरिटी फिचरचे नाव आहे 'ऑटो ब्लॉकर.'



सॅमसंगच्या या ऑटोब्लॉकरमुळे OneUI ६ ची सुरक्षितता अधिक वाढते. तुमच्या फोनमध्ये काही वेगळे घडत असेल, फोन हॅक होत असेल, तर फोनला त्याबद्दल जाणीव होऊ शकते. जेव्हा ऑटो ब्लॉकरची सेटिंग चालू केली जाते, तेव्हा एखाद्या अनऑथराईज्ड सोर्सचे ॲप इन्स्टॉलेशन ब्लॉक करणे, सिक्युरिटी चेक सुरू करणे, आणि USBच्या कमांड्स बंद करणे अशा सर्व गोष्टी या ऑटो ब्लॉकरमुळे केल्या जातात, ज्यामुळे तुमच्या चार्जिंग पोर्टद्वारे किंवा कोणत्याही कोडच्या मदतीने एखाद्या चुकीच्या ॲपला फोनमध्ये येण्यापासून बचाव करण्यास मदत होते.

या नवीन तंत्रज्ञानाच्या सुरक्षेमुळे, मेसेजेसमध्ये एखादा मालवेअर फोटो आला असल्यास तोदेखील ताबडतोब ब्लॉक करून टाकण्यास मदत केली जाते, परंतु ही सेटिंग फोनमध्ये काशी सुरू करायची ते पाहा.

ऑटो ब्लॉक असे सुरू करावे. OneUI ६ आधारित अँड्रॉइड जड १४ सॅमसंग फोनमधील ऑटो ब्लॉक सेटिंग सुरू करण्यासाठी, सर्वप्रथम सेटिंग्जमध्ये जावे. तेथील सिक्युरिटी अँड प्रायव्हसी हा पर्याय निवडावा. नंतर ऑटो ब्लॉकरवर क्लिक करून, टर्न ऑनवर क्लिक करावे.

संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सॅमसंग हे Mac-fee तंत्रज्ञानाचा उपयोग करीत आहे. त्यामुळे हे सेटिंग वापरण्यासाठी वापरकर्त्यांना त्यांची लायसन्स अँड प्रायव्हसी पॉलिसी एक्स्पेट करावी लागेल. ऑटो ब्लॉकर ही सेटिंग जरी फोनची सुरक्षितता वाढवत असली, तरीही त्याचे काही तोटेसुद्धा आहेत. जसे की, कोणतेही अनऑथोराइज्ड ॲप साईडलोड करता येणार नाही. त्यासोबतच कॉम्प्युटरवरून सॉफ्टवेअर अपडेट करता येणार नाही.

# संशोधक, अभ्यासक व लेखक न. र. फाटक



नरहर रघुनाथ तथा न. र. फाटक यांची ओळख चरित्रकार, इतिहास संशोधक, संत साहित्याचे अभ्यासक व लेखक, पत्रकार, प्राध्यापक अशी विविधांगी राहिली आहे. त्यांचा जन्म १५ एप्रिल १८९३ रोजी भोर या एके काळच्या संस्थानातील जांभळी गावी झाला. त्यांचा आज स्मृतिदिन.

फाटक यांचे शिक्षण भोर, पुणे, अजमेर, इंदूर आणि अलाहाबाद या ठिकाणी झाले. १९१७ साली अलाहाबाद विद्यापीठातून ते तत्त्वज्ञान हा विषय घेऊन बी.ए. झाले. त्यानंतर काही काळ विविध ज्ञानविस्तार, इंदुप्रकाश, नवाकाळ या नियतकालिकांच्या संपादनकार्यात त्यांनी भाग घेतला. 'सत्यान्वेषी' आणि 'फरिश्ता' या टोपण नावांनी त्यांनी बरेच वृत्तपत्रीय लेखन केले आणि आपल्या निर्भीड पत्रकारीचा ठसा उमटविला. १९३५-३७ या काळात श्रीमती नाथीबाई ठाकरसी विद्यापीठात आणि त्यानंतर मुंबईच्या रामनारायण रुईया कॉलेजात ते मराठीचे प्राध्यापक होते. याच कॉलेजातून १९५७ साली ते सेवानिवृत्त झाले.

इतिहासाचार्य राजवाडे यांच्यामुळे फाटक हे इतिहास संशोधनाकडे ओढले गेले होते. मराठी भाषा-साहित्याच्या व्यासंगाबरोबरच संस्कृत, इंग्रजी, हिंदी भाषांतील साहित्याचा त्यांनी रसिक व आस्थेवाईक दृष्टिकोनातून परिचय करून घेतलेला होता. त्यामुळे त्यांचे मराठीचे

**निमित्त**

अध्यापन एकांगी आणि एकारलेले असे न होता त्याला एक स्वाभाविक अशी बहुसंदर्भशीलता प्राप्त झालेली होती. केवळ पाठ्यपुस्तकांवर भर न देता त्यांच्या अनुषंगाने विविध विषयांचा परामर्श घेऊन आपल्या विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार करावयास प्रवृत्त करण्याचा त्यांचा प्रयत्न असे.

मराठी संताच्या वाङ्मयाचे आणि कार्याचे सामाजिक-ऐतिहासिक दृष्टिकोनांतून त्यांनी केलेले विश्लेषण आणि समालोचनही महत्त्वाचे आहे. सामाजिक-सांस्कृतिक इतिहास जाणून घेण्याचे एक साधन म्हणून फाटक साहित्याकडे पाहत. त्यांची ही वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयदृष्टी ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी (१९४८), श्री एकनाथ वाङ्मय आणि कार्य (१९५०), ज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य (१९५२), रामदास : वाङ्मय आणि कार्य (१९५२) यांसारख्या त्यांच्या ग्रंथांतून प्रत्ययास येते. मराठ्यांचा इतिहास हाही त्यांच्या व्यासंगाचा आणि चिकित्सेचा एक विषय. मराठेशाहीचा अभ्यास (१९५०) आणि अठराशे सत्तावनची शिपाईगर्दी (१९५८) हे त्यांचे दोन प्रसिद्ध इतिहासग्रंथ होत.

भारतीय राजकारणात महत्त्वपूर्ण कामगिरी केलेल्या न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक यांसारख्या महाराष्ट्रीय नेत्यांची चरित्रे लिहून त्यांच्या कार्याची मीमांसही फाटक यांनी केलेली आहे. आदर्श भारत सेवक (१९६७) या नावाने त्यांनी लिहिलेल्या गोपाळकृष्ण गोखले यांच्या चरित्र्याला १९७०मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. याशिवाय मुंबई शहराचा इतिहास त्यांनी लिहावयास घेतला होता, ते काम त्यांच्याकडून पूर्ण होत आले होते.

भारत इतिहास संशोधन मंडळ, प्राज्ञ पाठशाला मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई मराठी साहित्य संघ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ अशा विविध संस्थांशी सदस्य वा पदाधिकारी ह्या नात्याने त्यांचा संबंध आला होता. १९४७ साली हैदराबाद येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. मुंबई येथे २१ डिसेंबर १९७९ रोजी ते निधन पावले.

**-गं. ब. ग्रामोपाध्ये**

**क्लिक...क्लिक...!**




पुणे : दिवसभर अन्नाच्या शोधात वणवण केल्यानंतर जरा निवांत होऊन पाणी पिताना पक्षी...

## आरोग्य प्रहर

# थंडीमध्ये अळिवाचे लाडू खाणे फायदेशीर

हिवाळ्याच्या दिवसांमध्ये मुंबईतील अनेक नामवंत पदार्थ विक्रेत्यांच्या दुकानाबाहेर विशेषतः लाडू विक्रेत्यांकडे अळिवाचे ताजे लाडू खाणाऱ्यांची संख्या वाढलेली दिसते. हिवाळ्यात हे लाडू खाणे फायदेशीर ठरते.



अळिवाचे नारळाच्या पाण्यात शिजवून तयार केलेले खमंग लाडू पौष्टिक, औषधी आणि चविष्ट असतात. तेलबियांपैकी एक म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या अळिवाला वेगवेगळ्या भाषांमध्ये विविध नावांनी ओळखले जाते. मराठीत अहाळीव किंवा हलीम, हिंदी, बंगालीमध्ये हलीम, गुजरातीमध्ये अशेळीयो अशी अळिवाची विविध नावे आहेत. संस्कृतमध्ये चंद्रशूर आणि इंग्रजीत गार्डन क्रेस सीड्स नावाने ओळखले जाणारे अळिव आहार शास्त्रातदेखील त्याच्या गुणकारी गुणधर्मांमुळे प्रसिद्ध आहेत.

अळिवामध्ये उत्तम प्रमाणामध्ये लोह असते. विशेषतः यातील लोहाचे प्रमाण शरीरातील हिमोग्लोबिन वाढविण्यासाठी आणि पूर्ववत राखण्यासाठी अत्यंत उपयुक्त असते. लोहाव्यतिरिक्त कॅल्शियम, फॉलिक ॲसिड, बीटा कॅरोटीन यासारखी पोषणमूल्ये अळिवाचे आहारातील महत्त्व वाढवितात. खरेतर इथिओपियामध्ये सापडणारी ही आयुर्वेदिक वनस्पती आहे, मात्र भारतातदेखील अळीव मोठ्या प्रमाणात उगवते. ही वनस्पती अत्यंत गुणकारी आहे.

भारतामध्ये मुख्यत्वे हिवाळ्याच्या दिवसांमध्ये अळिवाचे लाडू तयार केले जातात, यामध्ये एक सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा हा आहे की अळिव शक्तीवर्धक आणि रेचक आहे. अनेकदा सलाडमध्ये अंकुरलेले अळिव घातलेले दिसतात. जीवनसत्व अ आणि क युक्त अंकुरित अळिव डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. मलावरोध असणाऱ्यांसाठीदेखील अळिवाची पाने किंवा अळिवाचे पाणी गुणकारी आहे.

तुम्ही अळिव कसे खाताय, अळिवाबरोबर कोणते पदार्थ करताय याने अळिवातील लोहाचे प्रमाण आणि जीवनसत्त्व 'क'चे प्रमाण अवलंबून असते. अळिवाचे लाडू तयार करताना नेहमी ओले खोबरे किंवा नारळ यांच्याबरोबरीने तयार केले जातात. एक महत्त्वाची गोष्ट इथे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे की अळिवाबरोबर कधीही हळद, आले, लसूण यांचा वापर करू नये. अळिवाबरोबर ज्या वेळेला तुम्ही हे पदार्थ वापरतात त्याला अळिवातील लोह शरीरात एकत्र करण्यासाठी अडथळा येऊ शकतो. शिवाय ज्यांना थायरॉईडचा त्रास आहे त्यांनी मात्र अळीव खाणे कटाक्षाने टाळावे.

# सीकेटी महाविद्यालयातर्फे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छता अभियान आणि राष्ट्रीय एकात्मता ह्या विषयावर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने १२ ते १८ डिसेंबर २०२३ दरम्यान कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, नेरे, तालुका पनवेल याठिकाणी सात दिवसीय विशेष रहिवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

मंगळवारी (दि. १२) शिबिराच्या उद्घाटनाला कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, नेरे चे कार्याध्यक्ष अ‍ॅड. प्रमोद ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती राहिली. महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या समाजकेंद्री उपक्रमांचा मागोवा घेतला.

अ‍ॅड. प्रमोद ठाकूर यांनी सीकेटी महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाचा शांतीवन परिसराच्या सर्वांगीण विकासाबाबतच्या भरीव योगदानाबाबत कौतुक केले. व्यासपीठावर कुष्ठरोग निवारण समितीचे चेअरमन प्रमोद ठाकूर, खारघर रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड, सीकेटी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, मानव्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. बी.एस. पाटील, वाणिज्यशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. एस.बी.यादव, विज्ञानशाखेच्या शाखाधिपती डॉ. जे. ठाकूर, परीक्षा व मूल्यमापन विभागाचे नियंत्रक प्रो. डॉ. एस. आय. उन्हाळे, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे पहिले प्रकल्प अधिकारी डॉ. डी. एस. नारखेडे, माजी मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एन.ढवळे, माजी कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. ए. के. दीक्षित आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर स्वयंसेवकांचे विविध संघांमध्ये विभाजन करण्यात आले व प्रत्येक संघासाठी एक स्वयंसेवक आणि एक स्वयंसेवीकेची संघनायक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

शिबिराचे पहिले बौद्धिक सत्र एनएसएसचे ठाणे जिल्हा समन्वयक जीवन विचारे यांनी एनएसएस आणि राष्ट्र निर्मिती या विषयावर मार्गदर्शन केले. बौद्धिक सत्रानंतर स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. तिसऱ्या दिवशी स्वच्छता आणि प्लास्टिक बंदी बाबत भव्य रॅली, नेरे प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात पथनाट्य सादर केले. सायंकाळी कीर्तनकार श्यामसुंदर सोन्नर महाराज यांनी महाविद्यालयीन युवक-युवतींना अध्यात्माचा वास्तवदर्शी अर्थ समजाविले.

चौथ्या दिवशी मुंबई विद्यापीठाच्या नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक प्रो. डॉ. मृदुल निळे यांनी निवडणूक प्रणालीमधील युवकांची भूमिका याविषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. सायंकाळी डॉ. विनारस दवणे (केंद्रीय विद्यापीठ इंदोर) यांनी पर्यावरण संधारण या विषयावर उपस्थितांना संबोधित केले. पाचव्या दिवशी संतोष पवार यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी आणि करिअरच्या वेगवेगळ्या वाटा याविषयावर संवाद स्पर्धा परीक्षेतील संधी आणि आव्हाने याबाबत जागरूकता निर्माण केली.

सहाव्या दिवशी रुसाचे सल्लागार डॉ. पांडुरंग बरकले यांनी साहित्यातून सर्वांगीण विकास या विषयवार स्वयंसेवकांशी संवाद साधला. सायंकाळी वीर वाजेकर फुंडे महाविद्यालयाच्या राज्शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. संदीप घोडके यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांची भूमिका याविषयावर स्वयंसेवकांशी हितगुज केली.

समारोप समारंभ जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सुर्यकांत परकाळे यांनी उपस्थितांसमोर सात दिवसांचा आढावा घेतला.

सात दिवसीय विशेष रहिवासी शिबिरात विशेष कामगिरी बजावणाऱ्या स्वयंसेवकांना प्रदान करण्यात येणाऱ्या पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून शुभम चव्हाण (एस. वाय. बीकॉम) आणि जान्हवी हातमोडे (एस. वाय.बी.ए.) तथा सर्वोत्कृष्ट नेतृत्व म्हणून मुलेश चौधरी (एस. वाय. बॅफ) आणि अदिती कासारे (एस.वाय.बी.ए.) यांची नावे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सुर्यकांत परकाळे यांनी जाहीर केली व त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

याबरोबर शिबिराच्या यशस्वी आयोजनाकरिता महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गात रोशन रोडपालकर, मिलिंद पाटील, शशिकांत घनसोळकर, स्वप्नील लिंगायत यांचा सत्कार केला. कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन नेरे चे कार्याध्यक्ष प्रमोद ठाकूर, प्रमुख कार्यवाहक विनायक शिंदे, कार्यवाहक नीलकंठ कोळी आदींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी करून कार्यक्रमाची अधिकृतपणे सांगता केली. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सुर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, प्रा. आलोक भानुशाली, प्रा. राहुल पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. रुपाली पाटील, ए.एस. एस. विषयक शिक्षक प्रा. रूपेश माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नेरळमध्ये मोबाईल चोरीचे गुन्हे उघड



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ परिसरात दोन मोबाईल चोरीच्या घटना घडून त्यात पाच मोबाईल चोरीला गेले होते. याबाबत फिर्यादी यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केल्यावर नेरळ पोलिसांनी आरोपीला जेरबंद करण्यासाठी कंबर कसली. तर या प्रकरणात सीसीटिव्ही पोलिसांसाठी महत्त्वाचा दुवा बनल्याने अखेर आरोपीला नेरळ पोलिसांनी गजाआड केले आहे.

नेरळ रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेले साईश्रद्धा हॉटेलमधून १५ हजार रुपये किमतीचे चार मोबाईल लंपास केले. तर येथून थोड्या अंतरावर असलेल्या सेवालाल नगर येथे घरातून एक मोबाईल लांबवला.

पोलिसांच्या पथकाने सीसीटिव्ही व गुप्त बातमीदार यांच्याकडून चौकशी केली असता तो तरुण बदलापूर येथील असल्याचे समजले त्यानुसार आकाश सुनिल पारधी (वय १९ वर्ष, रा. बदलापूर) याला पोलिसांनी ताब्यात घेतला. त्याच्याजवळ पोलिसांनी चौकशी केली असता त्याने गुन्हा कबूल केला. त्याला न्यायालयासमोर पोलिसांनी हजर केले असता त्याला पोलीस कोठडी मिळाली आहे. नेरळ पोलिसांनी आणखी एक गुन्हा उघड करत चोरट्यांच्या मनात दहशत निर्माण केली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की मौजे नेरेपाडा, तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री सतीश चंद्रकांत काळे यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे नेरेपाडा, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, नेरे ग्रामपंचायत हददीतील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| सर्व्हे नं. गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ६८ | - | लावणी लायक ०-३६-५०<br>पोट खराबा ०-०७-३०<br>एकुण ०-४३-८० | ८.३७ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरिल मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालका बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २०/१२/२०२३

कार्यालयीन पत्ता -
बी. १०२, पहिला मजला,
श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार
ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

सही
**ड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.,एल.एल बी.
(खरेदीदाराचे वकिल)
मो.: ८८८८२७१७५९

# बेशिस्त ट्रेलर चालकांवर गुन्हा

**खोपोली :** लोखंडी कॉईलची धोकादायक वाहतूक करणाऱ्या दोन ट्रेलरचालकांविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सर्व नियम पायदळी तुडवून ट्रेलरचालक जास्त टन वजनाच्या लोखंडी कॉईल वाहतूक करत असल्याने प्रवाशी आणि पादचारी यांच्या जिवाला धोका निर्माण झाला होता. ओव्हरलोड वाहतुकीवर कारवाईची मागणीला खालापूर पोलिसांनी प्रतिसाद देत ट्रेलर (एमएच ४६ सीएल ३२११) आणि ट्रेलर (एमएच ०१ एजी ७२०७) चालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जाहीर सूचना

सदर जाहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येत आहे की, आम्ही श्री शैलेश जगमोहन मंदानी राहणार मालढुंगे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड (यापुढे 'जमीनमालक' म्हणून संबोधले जाईल) यांच्या मालकीच्या खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमतेच्या (यापुढे 'अनुसूचीत मालमता' असे संबोधले जाईल) संदर्भातील मालकीहक्क, भोगवटाधिकार, सुविधाधिकार, धारणाधिकार, आणि हितसंबंध तपासत आहोत. ही जाहीर सूचना 'अनुसूचीत मालमता' संदर्भात 'जमीनमालकांच्या निर्विवाद मालकीहक्क पडताळणीसाठी जारी केली आहे.याद्वारे सूचित करण्यात येते की, 'अनुसूचीत मालमता संदर्भात कोणत्याही बँका, वितीय संस्था किंवा इतर कोणत्याही पक्ष किंवा व्यक्तीसह कोणताही व्यक्तीसमूह/ संस्था, ज्यांचे अनुसूचीत मालमतेमध्ये किंवा अनुसूचीत मालमतेच्या कोणत्याही भागमध्ये कोणताही हिस्सा, हक्क, भोगवटाधिकार, सुविधाधिकार, धारणाधिकार, लाभाधिकार, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी इ. असेल अथवा जमीनमालकांनी अनुसूचीत मालमतेचे विकासहक्क आणि/किंवा विक्री, भेट, भाडेपट्टा, उप- भाडेपट्टा, परवाना, विनिमयपत्र, वाटा-हिस्सा, गहाणखत, वारसाहक्क, विश्वस्त व्यवस्था, देखभालकरार, व्यवसायमुभा, वहिवाटहक्क, लिस-पेंडन्स, स्थगिती आदेश, संलग्नक, हुकूमनामा, विशिष्ट दिलासा किंवा अन्यथा किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे अधिकार/बोजा आहेत/असतील त्यांनी त्यांच्या हरकती/आक्षेप/ दावा इत्यादी काही असल्यास ते लेखी स्वरूपात संबंधित हरकती/आक्षेप/दावा यांची पुष्टी करणाऱ्या सर्व आधारभूत दस्तऐवजांसह, ही जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून १० (दहा) दिवसाचे आत खालील पत्यावर नोंदणीकृत डाकेने पाठवावेत. विहित कालावधीच्या नंतर आणि पुष्टी दस्तावेजाविना प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकती/आक्षेप/दावा इत्यादी यांची दाखल घेतली जाणार नाही व ते निष्फळ मानले जातील.

**अनुसूची**
(मालमतेचे विवरण)
मौजे मालढुंगे, ता. पनवेल, जिल्हा रायगड येथे स्थित खालील वर्णनाची शेतजमीन

| अ.क्र. | सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|
| १ | ९३ | १/ ब | ०.४४ |
| २ | ९३ | १/ क | ०.४६ |

स्वा./-
ठिकाण : - मुंबई
तारीख : - 21/12/2023

ॲड. विप्लव एस. खोब्रागडे
104, पहिला मजला, वीणा चेंबर्स, 21, दलाल स्ट्रीट, फोर्ट मुंबई- 400 001

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि.क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर) | मंजूर पात्रता | वाटपपत्र/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटपपत्र/करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| १ | उलवे २४५ | वहाळ ५७७ | ४३/५<br>६९/३<br>८६/६<br>१११/१४<br>११४/९<br>१२४/९<br>९२/१५<br>**एकुण** | ०-०९-५<br>०-०७-७<br>०-०६-०<br>०-०४-०<br>०-०२-८<br>०-०९-१<br>०-०१-३<br>०-०४-३<br>**०-४४-७** | ४०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. ४२७, सेक्टर-१९, क्षेत्र-३९९.२५ चौ.मी. | कै. दामाजी गणा पाटील (मयत) यांचे वारस<br>श्री. महादेव दामजी पाटील | अ) मुळ भूधारकांपैकी श्रीमती बानूबाई सावळाराम पाटील यांनी दुय्यम निबंधक पनवेल-१ येथे दि. २७.०७. २०२३ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल१-६०६२-२०२३ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित संपादित जमिनीन्वये मिळणाऱ्या उलवे संचिका क्र. २४५ मधील उलवे नोड येथील इरादित भुखंड क्र.४२७, सेक्टर-१९, क्षेत्र-४०० चौ. मी. या भुखंडाचे लाभ कै. दामजी गणा पाटील (मयत) यांचे वारस १) श्री. महादेव दामजी पाटील यांच्या लाभात हस्तांतरित केले आहेत.<br>**ब)** लाभार्थी भूधारकांपैकी १) श्रीमती रेऊबाई दत्तात्रेय पाटील, २) श्रीमती भिमाबाई बाबूराव म्हात्रे, ३) श्रीमती गुलाब चंद्रकांत म्हात्रे, ४) श्री. विठ्ठल गजानन ओवळेकर, ५) श्री. प्रभाकर गजानन ओवळेकर, ६) श्री. निलेश गजानन ओवळेकर यांनी दुय्यम निबंधक पनवेल-१ येथे दि. २०.०४.२००७ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल१-०३२७१-२००७ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून मौजे वहाळ निवाडा क्र.५७७, सर्व्हे क्र./हि.क्र. ४३/५ व इतर, एकुण क्षेत्र-०-४४-७ हे.आर. या प्रस्तावित संपादित जमिनीन्वये साडेबारा टक्के योजने अंतर्गत मिळणाऱ्या भुखंडाचे लाभ १) श्री. महादेव दामजी पाटील यांच्या लाभात हस्तांतरित केले आहेत. |
| २ | उलवे ९६५ | वहाळ ४१३ | २३७/१<br>२७२/१<br>२७२/४<br>२७२/६<br>२८३/८<br>**एकुण** | ०-१६-२<br>०-२-०<br>०-४-०<br>०-४-०<br>०-५-०<br>**०-३१-२** | २५० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. ४०५, सेक्टर-१९, क्षेत्र-२४९.७५ चौ.मी. | कै. आनंदीबाई रामचंद्र घरत (मयत) व कै. मैनाबाई बुधाजी पावशे (मयत) यांचे वारस<br>श्री. सुभाष बुधाजी पावशे | - |
| ३ | दापोली २४४ | दापोली २८९ | १६०/३<br>१६६/१<br>**एकुण** | ०-०२-३<br>०-२३-४<br>**०-२५-७** | २०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. १K/१, सेक्टर-८C, क्षेत्र-१९९.७३ चौ.मी. | मा. न्यायालयीन वारस दाखला क्र.११६/२०१३, रिट पिटीशन नं. ५८४६/२०१८ मधील दिनांक १७.०७.२०१८ रोजीचे मा. उच्च न्यायालयीन आदेश तसेच उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर यांच्याकडील अहवाल तसेच दिनांक १०.१०.२०२३, दिनांक १७.१०.२०२३, दिनांक २५.१०.२०२३ व दिनांक ३१.१०.२०२३ रोजीच्या सुनावणी अंतीच्या निष्कर्षानुसार<br>श्री. गणेश गणपत म्हात्रे | - |
| ४ | द्रोणागिरी ७५० | ९९ नवघर | ११/३<br>११८/११<br>१३२/१<br>१४६/५<br>१२५/२<br>१०१/१०<br>३६/६<br>४३/६<br>२९१/४<br>**एकुण** | ०-२-०<br>०-३-३<br>०-९-५<br>०-७-३<br>०-८-७<br>०-४-५<br>०-६-८<br>०-१४-४<br>०-३-५<br>**०-६०-०** | ५०० चौ.मी. | मौजे द्रोणागिरी सेक्टर-४८, भूखंड क्र. ८६, क्षेत्र-४९९.९८ चौ.मी. | **कै. द्वारकाबाई गणा म्हात्रे (मयत), कै. गणा आळशा म्हात्रे (मयत),** यांचे वारस<br>**१. श्री. जयवंत गणा म्हात्रे (मयत)** यांचे वारस १/१. श्री. प्रदिप जयंत म्हात्रे, १/२. श्री. भुषण जयंत म्हात्रे, १/३. सौ. मधवी गोवर्धन केणी, १/४. श्री. योगेश जयंत म्हात्रे, १/५. श्रीमती. प्रभावती जयंत म्हात्रे,<br>**२. सौ. सुमती परशुराम पाटील (मयत)** यांचे वारस २/१. सौ. नंदिनी नरेंद्र पाटील, २/२. श्री. दिपक परशुराम पाटील, २/३. सौ. सुजाता जिवन ठाकूर, २/४. सौ. गीता अशोक गावंड,<br>**३. अहिल्या गोपाळ म्हात्रे,**<br>**४. विमल गणा म्हात्रे,**<br>**५. सविता वसंत ठाकूर उर्फ गंगाबाई गणा म्हात्रे (मयत)** यांचे वारस ५/१. श्रीमती. प्रभावती जयंत म्हात्रे, ५/२. श्री. प्रदिप जयंत म्हात्रे, ५/३. श्री. योगेश जयंत म्हात्रे, ५/४. श्री. भुषण जयंत म्हात्रे, ५/५. श्रीमती. माधवी गोवर्धन म्हात्रे,<br>**६. कै. सुभद्रा भास्कर पाटील (मयत)** यांचे वारस ६/१. श्री. श्रीराम भास्कर पाटील, ६/२. श्री. मनोहर भास्कर पाटील, ६/३. श्री. सदानंद भास्कर पाटील, ६/४. श्री. हरेश्वर भास्कर पाटील, ६/५. सौ. भानुमती हरिश्चंद्र ठाकूर | निरंक |
| ५ | कळंबोली -२३ | ६७-कळंबोली | ३१/३<br>४१/२८ | ०-००-५<br>०-०६-० | ३८०० चौ.मी. पैकी २५० चौ.मी. | भुखंड क्र. ६८B, सेक्टर-२२, क्षेत्र - २५० चौ.मी. | **श्री. रामा मोतीराम जळे** | रे.मु.क्र.१९१/२००६ न्यायालयीन हिस्सेवाटणी तडजोडपत्र सादर आहे. |
| ६ | | १५८-कळंबोली | २२/२(१)<br>२२/२(२)<br>२२/२(३) | ०-३०-०<br>०-४२-५<br>०-१३-७ | | | | |
| ७ | | ९२-कळंबोली | २२/२/४ +५+६pt | ०-२७-१ | | | | |
| ८ | | १२२A कळंबोली | २०/३+४<br>२७/२<br>२८/३<br>२५/१A<br>२६/३<br>३३/१A<br>१५/१<br>१५/३ pt | ०-१४-२<br>०-०२-०<br>०-०६-३<br>०-००-५<br>०-१०-४<br>०-१०-१<br>०-२४-०<br>०-१२-१ | | | | |
| ९ | | १२२/B कळंबोली | २५/१B +२(pt)<br>१४/१ | ०-४-५<br>०-२१-० | | | | |
| १० | | ५५/ कळंबोली | ३०/४B | ०-५-८ | | | | |
| ११ | | १२२/ कळंबोली | ४३/८ | ०-०७-० | | | | |
| १२ | | १/ कळंबोली | ३९/२ | ०-१७-५ | | | | |
| १३ | | १२२/ कळंबोली | ४७/२<br>४७/४<br>५७/३pt | ०-००-८<br>०-९-९<br>०-२०-७ | | | | |
| १४ | | १२२/ कळंबोली | २४/१ | ०-७६-१ | | | | |
| १५ | | १२२/ कळंबोली | २३/१+३ | ०-६९-३ | | | | |
| १६ | | १४५ब/ कळंबोली | ८/१३७/३<br>८/१३७/४ | ०-०३-०<br>०-४५-६ | | | | |
| | | | **एकुण** | **४-८०-६** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४८८/२०२३-२४

# नवी मुंबईत पार्किंगची समस्या

## नियोजनासाठी आयुक्तांकडून आढावा बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या गाड्यांचे प्रमाण वाढल्याने सर्व शहरांसमोर गाड्यांच्या पार्कींगची बिकट समस्या उभी राहिलेली दिसून येते. नवी मुंबई शहरातही वाहने उभी करण्याची समस्या असून ती दूर करण्यासाठी नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर बारकाईने लक्ष देत आहेत. यादृष्टीने महानगरपालिकेचा संबंधित विभाग तसेच वाहतुक पोलीस विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभाग यांच्यासमवेत नियमित बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत सेक्टर १५, सीबीडी बेलापूर येथे ६९०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर तसेच सेक्टर ३० ए, वाशी येथे हॉटेल तुंगा समोर ११३०० चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर वाहनतळ विकसीत करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. या दोन्ही वाहनतळांची जागा रेल्वे स्टेशनजवळ असून या परिसरात मल्टीनॅशनल कंपन्यांची कार्यालये, हॉटेल्स, व्यावसायिक दुकाने अशी वाहनांच्या दृष्टीने वर्दळ असून या वाहनतळांचा फायदा वाहनांच्या मालक, चालकांना तर होईलच शिवाय या भागातील वाहने उभी करण्याच्या नियोजनालाही लाभदायी ठरेल.



या वाहनतळाच्या जागा कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी आढावा बैठक घेत तत्परतेने सर्वेक्षण करुन जलद कार्यवाही करण्याचे निर्देश अभियंत्रिकी व मालमत्ता विभागांना दिले.

हे दोन्ही वाहनतळ शासन व खाजगी संस्था भागिदारी (Public Private Partnership) तत्वावर विकसीत करण्याचे नियोजन असून याबाबतचे सादरीकरण आयुक्तांसमोर करण्यात आले. या अंतर्गत संस्थेमार्फत वाहतुकीची वर्दळ, वाहनतळाच्या जागेची रचना व उपलब्धता तसेच सध्या त्या परिसरात वाहने उभी करण्यासाठी वापरली जाणारी पध्दती अशा विविध बाबींचा बारकाईने अभ्यास केला जाणार आहे. सध्या कार्यालये व इतर व्यावसायिक गोष्टीने गजबजलेल्या या भागात मोठ्या प्रमाणावर वाहने रस्त्याच्या कडेला उभी केल्याचे दिसून येत असून त्यामुळे वापर करावयाच्या रस्त्याची रुंदी कमी होऊन वाहतूकीला ब-याच ठिकाणी अडचण निर्माण होत आहे. यावर उपाययोजनेच्या दृष्टीने हे दोन्ही वाहनतळ उपयोगी ठरणार आहे.

या भागातील सध्याच्या वाहतुकीचा विचार करण्यासोबतच या ठिकाणी भविष्यात होणाऱ्या विकासाचाही व त्यामुळे वाढणा–या वाहनांच्याही विचार करावा असे आयुक्तांनी सूचित केले. या वेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार म्हसाळ, शहर अभियंता संजय देसाई, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यावान उबाळे, मुख्य लेखा परीक्षक जितेंद्र इंगळे, मालमत्ता विभागाचे उपायुक्त डॉ.राहुल गेठे, सहाय्यक संचालक नगररचना सोमनाथ केकाण, कार्यकारी अभियता अरविंद शिंदे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### ‘प्रत्येक टप्प्यावरील सर्वेक्षण काटेकोरपणे करा’

सद्यस्थितीत नवी मुंबई महापालिकेमार्फत विविध ठिकाणी वाहनतळासाठी निश्चित केलेले दर यांच्याही तौलनीक अभ्यास करावा व याबाबत आयआयटीकडूनही दर तपासून घ्यावेत, असे निर्देश आयुक्तांनी दिले. वाहनतळ कार्यान्वित करण्याचे नियोजन करताना विविध पर्यायांचा विचार करावा, अशी सूचना आयुक्तांनी केली तसेच प्रत्येक टप्प्यावरील सर्वेक्षण काटेकोरपणे करावे, असे सूचित केले.

# भाताणच्या उपसरपंचपदी भाजपचे अरुण पाटील



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील भाताण ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक बुधवारी (दि. २०) पार पडली. या निवडणुकीत उपसरपंचपदी भाजपचे अरुण पाटील यांची बिनविरोध निवड झाली. तरुण आणि होतकरू असलेले अरुण पाटील हे उपसरपंचपदाला न्याय देतील आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध विकासकामे करतील, असा विश्वास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केला.

ग्रामपंचायतीच्या कार्यालयात झालेल्या निवडणुकीच्या दरम्यान तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, माजी सभापती वसंत काठावले, भाताण ग्रामंपचायतीचे सरपंच तानाजी पाटील, ग्रामपंचायत सदस्य दीपक ठाकूर, रसिका भोईर, रजनी मुकादम, अस्मिता काठावले, अरुणा गाताडे, माजी उपसरपंच बाळाराम मुकादम, सावळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुनील माळी, अविनाश गाताडे, प्रवीण खंडागळे, माजी सभापती देविदास पाटील, सुभाष भोईर, उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चा चिटणीस प्रिया मुकादम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी नवनिर्वाचित उपसरपंच अरुण पाटील यांना शुभेच्छा दिल्या आणि अरुण पाटील यांनी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवाव्यात, असे आवाहन केले.

# पिल्लई रसायनी कॅम्पसतर्फे एनव्हिजन कार्यक्रम

## जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**रसायनी : प्रतिनिधी, पनवेल : वार्ताहर**

महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई एचओसीएल एज्युकेशनल कॅम्पस तर्फे रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी एनव्हिजन २०२३ या कार्यक्रमाचे आयोजन नुकताच करण्यात आले होते. या मध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व तांत्रिक अशा विविध प्रकारच्या एकूण ३२ स्पर्धांचा समावेश होता.

या वेळी रायगड जिल्ह्यातील जवळपास ५० हुन अधिक शाळांनी तर हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. मोठ्या उत्साहात या स्पर्धा झाल्या. या वेळी खालापूर विभाग पोलीस उपअधीक्षक विक्रम कदम, गटशिक्षण अधिकारी कैलास चोरमाळे, केंद्रप्रमुख किशोर परदेशी, महात्मा एजुकेशन सोसायटीच्या पब्लिक रिलेशन्स व कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स डिरेक्टर डॉ. निवेदिता श्रेयांस यांची मुख्य उपस्थिती लाभली.

पिल्लई एचओसीएल एज्युकेशनल कॅम्पसतर्फे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नेहमीच कम्युनिटी आउटरीच इनिशिएटिव्ह प्रोग्रॅम अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याच अनुषंगाने एनव्हिजन या बहुआयामी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रश्नमंजुषा, हस्ताक्षर, निबंध लेखन, शुद्धलेखन, गणित ऑलिम्पियाड, विज्ञान परिषद, वक्तृत्व,व्यवसाय योजना, नृत्य, गायन, फॅशन शो, चित्रकला, रांगोळी, एकपात्री अभिनय, हस्तकला, छायाचित्रण, मेहेंदी, पाककला, कविता लेखन, बास्केटबॉल, बॉक्स क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, लांब उडी, १००मी शर्यत, ४*१०० मी रिले, बुद्धिबळ, कॅरम, सीएस–गो, लघुपट, मिम बनविणे, ड्रोन वर्कशॉप, एथिकल हॅकिंग, सॉलिड वर्क, लेजर कटर व थ्री डी, प्रिंटर वर्कशॉप या स्पर्धांचा समावेश होता.

या कार्यक्रमास पिल्लई एचओसीएल एज्युकेशनल कॅम्पस डेप्युटी सीईओ व एसीएस कॉलेज प्रिन्सिपल डॉ. लता मेनन, इंजीनिअरिंग कॉलेज प्रिन्सिपल डॉ. जे डब्लू बाकल, आर्किटेक्चर कॉलेज प्रिन्सिपल सुचिता सयाजी, डिप्लोमा सेक्शन प्रमुख अमर मांगे, एजुकेशन व रिसर्च कॉलेज प्रिन्सिपल ममता पाटील, पिल्लई एचओसीएल इंटरनॅशनल स्कुल प्रिन्सिपल रिमा निकाळजे, वाइस प्रिन्सिपल पाटील सर मार्केटिंग हेड गणेश शिंदे, अॅडमिनिस्ट्रेटर दिलीप महाडिक यांची उपस्थिती लाभली.



# सीकेटी महाविद्यालयात उद्या राष्ट्रीय स्तरावरील परिषद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात गणित विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा व सामंजस्य करार भागीदार मराठा विद्या प्रसारक समाज, के. टी. एच.एम. महाविद्यालय, नाशिक व राष्ट्रीय उच्च्तर शिक्षा अभियाना अंतर्गत शुक्रवारी (दि. २२) १० वाजता राष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे.

या परिषदेसाठी प्रमुख पाहुणे डॉ. होमी भाभा राज्यस्तरीय विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. रजनीश कामत, एच. आर. डी.सी. संचालक रामानुजन संस्था मद्रास विद्यापीठाचे डॉ. के. कालीराज, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रो. डॉ. सुभाष केंद्रे आणि मुंबई विद्यापीठाचे गणित विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. भाऊसाहेब देसले उपस्थित राहतील.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे समन्वयक व गणित विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. सुभाष उन्हाळे, गणित विभागाचे प्रा. सागर खैरनार, प्रा. नीलिमा घरत, प्रा. नेहा पाटील, प्रा. मयुरी जोशी हे विशेष परिश्रम घेत आहेत.

या परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# भाजपतर्फे आधार कार्ड शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष, नेरूळ विभाग प्रभाग क्रमांक ९४ च्या वतीने माजी परिवहन सभापती प्रदीप गवस आणि माजी नगरसेविका श्रध्दा गवस यांच्या वतीने नेरूळमध्ये आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ नेरूळमधील सुमारे १०० गरजू नागरिकांनी घेतला.

नागरिकांचे नवीन आधार कार्ड बनविणे, बायोमेट्रिक अपडेट करणे, मोबाईल नंबर अपडेट, नवीन मोबाईल नंबर लिंक, संबंधित व्यक्तींचे नाव, जन्मतारीख आणि पत्ता अपडेट करणे आणि इतर दुरुस्ती करण्यासाठी नेरूळमधील भाजप जनसंपर्क मध्यवर्ती कार्यालय सेक्टर १०



येथे आधार कार्ड शिबिराचे आयोजन नवी मुंबई डाक विभाग यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. गरजू नागरिकांचा प्रतिसाद पाहता पुढील मंगळवारी पुन्हा शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याचा अधिकाधिक गरजू नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन माजी सभापती प्रदीप गवस यांनी केले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ओरिएंटेशन प्रोग्रॅम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. १९) सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट व माय स्टुडिया कंपनीच्या संयुक्त विद्यमाने ओरिएंटेशनचे आयोजन केले होते.

ओरिएंटेशनसाठी माय स्टुडिया कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहुन महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व



विद्यार्थिनीना भारताबाहेर असणाऱ्या करिअरच्या वेगवेगळ्या संधी तसेच त्याविषयी करावी लागणारी पूर्वतयारी याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील सुमारे ६० विद्यार्थी व विद्यार्थिनीनी या ओरिएंटेशन प्रोगॉमचा लाभ घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली हा ओरिएंटेशन प्रोग्रॅम घेण्यात आला व त्यांनी विद्यार्थ्यांच्या करिअरच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

या ओरिएंटेशन प्रोग्रॅमचे आयोजन सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंटचे समन्वयक प्रा. रेवन शिंदे यांनी केले आहे तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. रूपाली नागरेकर, प्रा. योगिता पाटील, विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## निवडक

### भाजपच्या वतीने कोर्सेस सुरू

**नवी मुंबई :** जुईनगर भाजप विभाग यांच्या वतीने माजी नगरसेवक काशिनाथ ज.पाटील व भाजप जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेश ज. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जुईनगर येथील गरजू महिलांसाठी विविध कोर्सेस सुरू करण्यात आले. याचा शुभारंभ माजी महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते करण्यात आला. जुईनगर येथील जनसंपर्क कार्यालय येथे गरजू महिलांसाठी मोफत ब्युटी पार्लर, फॅशन डिजाईनिंग, ब्युटी पार्लर, मेहंदी क्लासेस इत्यादी कोर्सेस सुरू करण्यात आले असून कोर्सेस पूर्ण झाल्यानंतर शासकीय प्रमाणपत्रे वितरित करण्यात येणार आहेत. या कोर्सेसला मोठा प्रतिसाद लाभत आहे.

### सुयश डिकवलकर यास पीएचडी

**नवी मुंबई :** नेरूळ येथील सुयश डीकवलकर याने मुंबई विद्यापीठाची पीएचडी प्राप्त केली आहे. रेडिओ लहरींचे प्रजनन प्रक्रियेवर होणारे दुष्परिणाम या विषयावर सुयश याने संशोधन प्रबंध सादर केला होता. सुयश हे सिद्धार्थ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. सुयश हे नेरूळ येथे राहतात. अतिशय खडतर अशी त्यांची शैक्षणिक वाटचाल होती. त्यावर मात करत सुयश यांनी पीएचडी प्राप्त केल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यातर्फे गव्हाण विद्यालयाला ग्रंथ संच भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शालेय स्वच्छता अभियान व अभिवादन सभेचे आयोजन करून लोकसंत गाडगेबाबा यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी झालेल्या अभिवादन सभेत विद्यालयाच्या ग्रंथालयास लोकनेते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या वतीने ४२ पुस्तकांचा संच भेट देण्यात आला.

विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपशिक्षिका अपर्णा देवकुळे, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, ‘रयत’चे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे व अन्य शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनीच्या वतीने नुकत्याच झालेल्या विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवल्याबद्दल विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.त्याचप्रमाणे लोकनेते दि.बा.पाटील स्फूर्ती स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना देखील प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

तत्पूर्वी विद्यार्थ्यांनी संपूर्ण शालेय परिसराची स्वच्छता करून स्वच्छता अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविले. स्वच्छता अभियान यशस्वी करण्यामध्ये प्राचार्य गोवर्धन गोडगे, रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, प्रमोद करावकर, प्रशांत परदेशी, शितलकुमार म्हात्रे तसेच उज्वला म्हात्रे, चारुशीला ठाकूर, उर्मिला गोंधळी, अस्मिता वर्तक, योगिता पाटील, सुजाता शेलार, अपर्णा देवकुळे, सोनल घरत, ज्योत्स्ना कोळी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन अभियान यशस्वी केले.

# ‘लायन्स’तर्फे कराओके गायन स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमने आयोजित केलेल्या आंतर शालेय कराओके गायन स्पर्धेला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पनवेल मध्ये प्रथमच या स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा २ टप्प्यात घेण्यात आल्या.

या स्पर्धेमध्ये विजेत्यांची नावे खालील प्रमाणे गट ५वी ते ७वी प्रथम क्रमांक – जुई ढोले, द्वितीय क्रमांक – शुभ्रा कांबळे, तृतीय क्रमांक – आदेश शेडगे, उत्तेजनार्थ – देवश्री घोडके, स्वरा भुजबळ, गट ८ वी ते १० वी प्रथम क्रमांक – स्वर म्हात्रे, द्वितीय क्रमांक – माऊली राऊत, तृतीय क्रमांक – जिया फडके उत्तेजनार्थ – साक्षी साबळे, सिमरदीप सिंग हे आहेत, या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून रिजन चेअरमन ला. मिलिंद पाटील आणि विशेष अतिथी म्हणून बांठीया हायस्कूलचे मुख्याध्यापक माळी सर उपस्थित होते. ला.मिलिंद पाटील आणि माळी सर यांनी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले कलागुण दाखविण्याची संधी मिळाली असल्याचे सांगून या उपक्रमाच्या आयोजनाबद्दल सरगम क्लब चे कौतुक केले.

क्लबच्या अध्यक्ष ला. स्वाती गोडसे यांनी आमच्या पुढील उपक्रमांना असेच सहकार्य मिळेल हा विश्वास व्यक्त केला आणि या स्पर्धसाठी डिस्ट्रिक्ट कमिटी टॅलेंट हंट चे ला. सुयोग पेंडसे यांनी सहकार्य केल्याबद्दल आभार मानले. प्राथमिक फेरी साठी ला. संविदा पाटकर आणि ला. संजय गोडसे तर अंतिम फेरीसाठी विजय मनोहर आणि विनायक प्रधान यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ला. मानदा पंडित यांनी केले. या कार्यक्रमाला ला. अलकेश शहा, धवल शहा, एड सुनील देशपांडे तसेच पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



## निवडक

### आनंदीबाई महाविद्यालयाचे सुयश

**नागोठणे** : येथील कोएसोच्या आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र पदव्युत्तर विभागाच्या विध्यार्थ्यांनी चांगल्या प्रकारे यश



मिळविले असून त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सिद्धार्थ पाटील, कार्यवाह पल्लवी पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक खोपकर, महाविद्यालय विकास समिती वरीष्ठ सदस्य संजय पाटील, प्र. प्राचार्य डॉ. संदेश गुरव, विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिनेश भगत, अभ्यासक्रम समन्वयक प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे व डॉ. विलास जाधवर सह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गांनी सर्वांचे अभिनंदन केले व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. नुकताच मुंबई विद्यापीठाने रसायनशास्त्र पदव्युत्तर विभागाचे निकाल जाहिर केले आहेत. या परीक्षेत महाविद्यालयाचे २०पैकी १९ विद्यार्थी चांगल्या गुणांनी पास झाले आहेत. परीक्षेत अनुक्रमे आक्रोश पाटील प्रथम क्रमांक, ऋतिक शिंदे द्वितीय क्रमांक व निखिल हार्नेकर तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

### आदर्श पतसंस्थेतर्फे नेत्रतपासणी



**अलिबाग** : आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या पोयनाड शाखेचा चौथा वर्धापन सोमवारी (दि. १८) साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाचे औचित्य साधून आदर्श नागरी सहकारी पतसंस्था, लायन्स क्लब अलिबाग-पोयनाड, लायन्स हेल्थ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्रचिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात १९५ जणांची नेत्र चिकित्सा करण्यात आली. यातील ६१ रुग्णांची नेत्रबिंदू शस्त्रक्रिया 'आदर्श'मार्फत मोफत करण्यात येणार आहे. या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे संचालक व पोयनाड शाखा पालक संचालक अनंत म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी लायन्स क्लब पोयनाडचे सर्व सदस्य, माजी मुख्याध्यापक के. डी. म्हात्रे, डॉ. शुभदा कुडतळकर यांचा सत्कार करण्यात आला. राजन पांचाळ यांना बाळशास्त्री जांभेकर राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी संस्थेचे संचालक अनंत म्हात्रे, सतीश प्रधान, विलाप सरतांडेल उपस्थित होते.

# रेशन दुकानात निकृष्ट तांदूळ

## रोहा गोफण गावातील प्रकार; ग्रामस्थांचा आरोप

**रोहा : प्रतिनिधी**

तालुक्यातील गोफण या गावात मंगळवारी (दि. २०) रेशन दुकानात निकृष्ट दर्जाचे तांदूळ नागरिकांना देण्यात आले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तांदूळ निकृष्ट दर्जाचे होतेच परंतु तांदळात उंदराची, कबुतरांची विष्टा यांसह अन्य कचरा आढळून आला. ही बाब सामाजिक कार्यकर्ते शशिकांत कडू यांनी रोहा पुरवठा विभाग व रोहा तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिले. हा तांदूळ खराब असल्याचे तांदळाची पिशवी दाखविण्यात आली.



गोडावूनमधूनच तांदूळ खराब आले आहे. या धान्यात उंदराची, कबुतरांची विष्टा व घाण आढळून आल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. यासंबंधी तहसीलदार किशोर देशमुख व पुरवठा अधिकारी उज्ज्वला अंधारे यांना शशिकांत कडू यांनी हे धान्य निदर्शनास आणून दिल्यानंतर या प्रकाराची चौकशी करण्याचे आश्वासन तहसीलदार किशोर देशमुख यांनी दिले.

ग्रामस्थांना खराब तांदूळ बदलून देणार असल्याचे पुरवठा अधिकारी उज्ज्वला अंधारे यांनी सांगितले.

**आम्ही वारंवार दुकानदारांना सूचना देत आहोत. खराब धान्य असल्यास वाटू नका, धान्य बदलून देण्यात येईल. गोफण येथे रेशन दुकानदाराने निकृष्ट दर्जाचे तांदूळ वाटले असल्यास बदलून देण्यात येईल.**
**-उज्ज्वला अंधारे, पुरवठा अधिकारी, रोहा**

**कोणत्याही दुकानात खराब धान्य वाटप होत असल्यास आम्हाला निदर्शनास आणून द्या. गोफण येथील या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दुकानदारांना नोटीस काढण्यात येईल.**
**-किशोर देशमुख, तहसीलदार, रोहा**

**गोडावूनमधूनच तांदूळ खराबच मिळत आहे. खराब धान्य असल्यास बदलून देण्यात येईल.**
**-रघुनाथ कडू, दुकानदार, गोफण**



**मंगळवारी रेशन दुकानातून तांदूळ निकृष्ट दर्जाचे आले असून या तांदळात उंदराची, कबुतरांची विष्टा व कचरा होता. या निकृष्ट व घाण असलेले तांदूळ मी पुरवठा अधिकारी व तहसीलदारांना निदर्शनास आणून दिले आहे.**
**-शशिकांत कडू, ग्रामस्थ, गोफण**

## पौष्टिक तृणधान्याविषयी पथनाट्यातून जनजागृती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, जिल्हा प्रशासन रायगड व प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने पौष्टिक तृणधान्य पथनाट्याद्वारे अलिबाग बसस्थानकात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले यांच्या उपस्थितीत जनप्रबोधन करण्यात आले.

या वेळी अलिबाग आगार प्रमुख वनारसे, उपप्रकल्प संचालक आत्मा शिवाजी भांडविलकर, उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे, तालुका कृषी अधिकारी प्रदीप बैनाडे, कृषी सहाय्यक मोहन सूर्यवंशी, जिल्हास्तर सल्लागार जयवंत कांबळी, तंत्र सहाय्यक रायगड किमया म्हात्रे,कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, प्रिझम संस्थेच्या अध्यक्ष तपस्वी गोंधळी, आधार फाउंडेशनचे धनंजय कवठेकर, प्रवासी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या ठिकाणी तृणधान्याची रांगोळी रेखाटण्यात आली होती. सर्व उपस्थितांना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी मार्गदर्शन केले, तसेच पौष्टिक तृणधान्याचे महत्त्व सांगितले व आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यातील ५० ठिकाणी पथनाट्यातून जनप्रबोधन करण्यात येणार असल्याचेदेखील सांगितले.



## मुरूड पोलिसांकडून नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरूड पोलीस ठाण्याकडून मराठा समाजाचे आरक्षण प्रश्न तसेच इतर मागासवर्गीय आरक्षणसंदर्भात शांतता कमिटीची बैठक नुकतीच झाली. पोलीस निरीक्षक निशा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

या वेळी शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, दुकानदार आसोसिएशनचे अध्यक्ष जाहिद फकजी, बाजारपेठ मुस्लिम समाज अध्यक्ष राशिद फहीम, पेठ मोहल्ला मुस्लिम समाज अध्यक्ष अल्ताफ मलीक, श्रीकांत सुर्वे, मनोज कमाने, फैसल उलदे, महेश मानकर, राजन मानकर आदी उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक निशा जाधव यांनी सांगितले की, मराठा समाज आरक्षणासंदर्भात अथवा ओबीसीसंदर्भात कोणतेही आंदोलन अथवा मोर्चा काढावयाचा असेल, तर सर्वप्रथम स्थानिक प्रशासन व मुरूड पोलिसांना माहिती द्यावी. समाजात शांतता राखण्यासाठी सर्व लोकांनी सहकार्य करावे. इतर ठिकाणी झालेल्या आंदोलनाचा आपल्याकडे कोणताही परिणाम होऊ नये यासाठी आपापसात चांगले संबंध असावे. समजूतदारपणा प्रत्येकाने बाळगावा व तालुक्यात शांतता कशी अबाधित राहिल, याची प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

या वेळी सर्व शांतता कमिटी सदस्यांनी आपला तालुका शांत असून कोणताही अनुचित प्रकार घडणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली.

## मुरूड मांडला शाळेत अध्ययन निश्चिती प्रशिक्षण

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या मांडला मराठी शाळेत तालुकास्तरीय अध्ययन निश्चिती प्रशिक्षणाचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. या वेळी मुरूड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी, शिक्षकांची भूमिका विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनास निश्चितच पोषक ठरेल, असे सुतोवाच करून, हे या प्रशिक्षणाचे फलित असल्याचे सांगितले.



दुसऱ्या टप्प्यातील या प्रशिक्षणाच्या उद्घाटनावेळी मुख्य मार्गदर्शक राजेंद्र नाईक यांनी सर्व उपस्थित प्रशिक्षणार्थींचे स्वागत केले, तर मांडला आणि बोर्ली केंद्राच्या केंद्रप्रमुख मोहिनी पाटील यांनी प्रशिक्षणाचा हेतू प्रास्ताविकातून मांडला.

जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययनाची सवय रुजविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे सांगण्यात आले. लहान मुले ही अनुकरणप्रिय असतात. कृती करून, सहभाग घेण्यास प्रवृत्त करणे ही शिक्षकाची भूमिका असावयास हवी. प्रत्यक्ष सहभागातून घटकाचे चिरकाल अस्तित्व टिकवून ठेवणे सोपे जाते. पाठांतर आणि घोकंपट्टीला बगल देऊन कृतिपाठ, विद्यार्थी सहभाग वाढवून आत्मविश्वास आणि धारिष्ट्य वृद्धिंगत करणे, या प्रशिक्षणातून साध्य होणार असल्याचे या वेळी मुख्य प्रशिक्षक राजेंद्र नाईक आणि मिलिंद पालवणकर यांनी सांगितले.

या वेळी प्रमुख उपस्थितांमध्ये केंद्रप्रमुख मोहिनी पाटील, महेश कवळे, महेश भगत, सुरेश नांदगावकर, विश्वनाथ म्हात्रे, संतोष पुकळे, अंजली मोटे, प्रवीण भगत, जयवंत पाटील, शरद पाटील, इमरान खान, राजेंद्र साळावकर, समीक्षा नांदगावकर, भास्कर साळावकर, प्रतीभा वर्तक, संपदा चांदोरकर, अपेक्षा म्हात्रे, अशोक म्हात्रे, संजय बंदरी, सारिका वाटवे, संजना कोटकर आदींसह ५०हून अधिक शिक्षक उपस्थित होते.

## रोह्यात आरोग्य शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील तळाघर पटांगणात राजमुद्रा फाउंडेशन, सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान, उन्नती हॉस्पिटल व आयसीयु पनवेल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिर व आयुष्मान योजना नोंदणीचे आयोजन केले होते.

शिबिराचे उद्घाटन माजी सैनिक तुकाराम करम यांच्या हस्ते करण्यात आले. परिसरातील ९१ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली तर त्यातील सहा जणांवर शस्त्रक्रिया पनवेल येथील हॉस्पिटलमध्ये करण्यात येणार आहेत, तर ४० लोकांनी आयुष्मान ई-कार्ड नोंदणी केली.



सर्वसामान्य कुटुंबांना पैशाअभावी विविध आजार असतील तर शस्त्रक्रियेसाठी खूप अडचणी निर्माण होतात. त्यामुळे महात्मा फुले जन आरोग्य योजना आयुष्यमान प्रधानमंत्री जनआरोग्याची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहचावी म्हणून गावपातळीवर आरोग्याविषयी महत्त्वाचे कॅम्प विविध ठिकाणी घेत आहोत. त्यामुळे अशा शासकीय योजनांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आव्हान रोहा तालुका भाजपचे अध्यक्ष अमित घाग यांनी केले.

या वेळी उन्नती हॉस्पिटल आणि आयसीयू पनवेल डिरेक्टर पांडुरंग वराळ, डॉ. बाळु हडगावकर, मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह श्रीकांत किल्लेकर, प्रतिक पानकर, आरती चेरफळे, मिनल पाटील या नर्स स्टाफ, भाजप महिला मोर्चा चिटणीस श्रद्धा घाग, राजमुद्रा फाउंडेशनचे कार्याध्यक्ष राजेश भगत, सचिव श्रीकांत दर्डे, तालुका भाजप कामगार अध्यक्ष विलास डाके, दक्षिण रायगड युवा मोर्चाचे जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, सचिन मोरे, रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य वैभवी भगत, सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे हजी कोठारी, राकेश चाफेकर, संकेत मोरे, अविनाश भगत, रितेश किर्तने , धीरज मोंढे, परशुराम मने, निखिल वाळंज, प्रणित भगत, ज्ञानेश्वर भगत यांसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पर्यावरण संवर्धनासाठी एनएसएस विद्यार्थ्यांचे निवासी शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन जनजागृतीसाठी केएमसी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विद्यार्थ्यांचे खालापूर तालुक्यातील होराळे येथील श्री विठ्ठल मंदिरात श्रमसंस्कार निवासी शिबिर १८ ते २४ डिसेंबरदरम्यान आयोजन करण्यात आले आहे.

या आयोजित संस्कार निवासी शिबिरात हो राळे गाव परिसरातील ग्रामस्वच्छता, वनबंधारा, एड्स जनजागृती, श्रमदान, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती गाव, सर्वेक्षण, आरोग्य तपासणी, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर सामाजिक कार्याची आवड निर्माण व्हावी, यासाठी महाविद्यालयातर्फे अशा निवासी शिबिराचे आयोजन करण्यात येत असते. या शिबिरांचे उद्घाटन खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील, उपाध्यक्ष दिलीप पोरवाल, रायगड भूषण हभप रामदास पाटील, डॉ. विनायक गांदल, डॉ. पंचदल्ले, विलास मगर, ए. बी. पाटील, संजय डायरे, पूजा यादव, श्रद्धा पडवळ, ऋतुजा होजगे, प्रा. कमलाकर हिरवा, ग्रामस्थ उपस्थित होते.



## मोटार वाहन निरीक्षकांचा शिबिर दौरा जाहीर

**रायगड : रामप्रहर वृत्त**




उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षकांचा जानेवारी ते जून २०२४ या कालावधीचा शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर झाला आहे.

हे शिबिर ९ जानेवारी मुरूड, १० जानेवारी रोहा, १२ व २९ जानेवारी अलिबाग, ८ व २२ जानेवारी महाड, २३ जानेवारी श्रीवर्धन, २४ जानेवारी माणगाव; ६ फेब्रुवारी मुरूड, ७ फेब्रुवारी रोहा, २ व १६ फेब्रुवारी अलिबाग, ५ व २० फेब्रुवारी महाड, २१ फेब्रुवारी श्रीवर्धन, २२ फेब्रुवारी माणगाव; ५ मार्च मुरूड, ६ मार्च रोहा, १० व २६ मार्च अलिबाग, ४ व १८ मार्च महाड, १९ मार्च श्रीवर्धन, २० मार्च माणगाव; ४ एप्रिल मुरूड, ५ एप्रिल रोहा, ८ व २२ एप्रिल अलिबाग, ३ व २४ एप्रिल महाड, २५ एप्रिल श्रीवर्धन, २६ एप्रिल माणगाव; ७ मे मुरूड, ८ मे रोहा, ३ व २७ मे अलिबाग, ६ व २० मे महाड, २१ मे श्रीवर्धन, २२ मे माणगाव; ४ जून मुरूड, ५ जून रोहा, ७ व २४ जून अलिबाग, ३ व १९ जून महाड, २० जून श्रीवर्धन, २१ जून माणगाव असे असणार आहे.

## हिरवळ महाविद्यालयात अकाउंट्स आणि टॅक्सेशन कार्यशाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाडमधील आयक्यूएसी विभाग व व्यवस्थापन विभागाच्या वतीने शनिवारी (दि.१६) आत्मनिर्भर करिअर ऑप्शन इन अकाउंट्स अँड टॅक्सेशन या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.



या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून चार्टर्ड अकाउंटंट राजेंद्र डांगी हे उपस्थित होते, तसेच प्राचार्य सुदेश कदम, हिरवळ रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य राकेश वडवळकर, आयक्यूएसी प्रमुख प्रो. ज्योती पुजारी उपस्थित होते.

राजेंद्र डांगी यांनी, पदवीनंतर विविध क्षेत्रातील संधींविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांचे भविष्य बदलण्यासाठी त्यांनी डी + एस + सी (ड्रीम + सक्सेस +कॅपॅबिलिटी) या त्रीसुत्रीचा अवलंब करावा असे आवाहन केले. ६८ विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांच्या सहकार्यातून या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भविष्यात अकाउंट्स अँड टॅक्सेशन क्षेत्रात उज्ज्वल करिअर करण्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया व हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आभार व्यक्त केले.



# शमीसह २६ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रीय खेळ पुरस्कारांची बुधवारी (दि. २०) घोषणा करण्यात आली. ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार हा सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी या बॅडमिंटन जोडीला मिळाला आहे, तर वर्ल्डकप २०२३मधील कामगिरीनंतर मोहम्मद शमीला अर्जुन पुरस्कार देण्यात आला आहे. हे सर्व राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार ९ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रपती भवनात राष्ट्रपतींच्या हस्ते खेळाडूंना प्रदान करण्यात येणार आहेत.

क्रीडा मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हे सर्व पुरस्कार खेळाडूंना त्यांच्या खेळातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल देण्यात येणार आहेत. खेलरत्न पुरस्कार चिराग शेट्टी बॅडमिंटन, सात्विक साईराज रँकीरेड्डी बॅडमिंटन, तर अर्जुन पुरस्कार ओजस प्रवीण देवतळे धनुर्विद्या, अदिती गोपीचंद

## बॅडमिंटनपटूंच्या जोडीचा खेलरत्न सन्मान

स्वामी धनुर्विद्या, श्रीशंकर अॅथलेटिक्स, पारुल चौधरी अॅथलेटिक्स, मोहम्मद हुसामुद्दीन बॉक्सर, आर. वैशाली बुद्धिबळ, मोहम्मद शमी क्रिकेट, अनुष अग्रवाल घोडेस्वारी, दिव्यकृती सिंग अश्वारूढ पोशाख, दीक्षा डागर गोल्फ, कृष्ण बहादूर पाठक हॉकी, सुशीला चानू हॉकी, पवन कुमार कबड्डी, रितू नेगी कबड्डी, नसरीन खो-खो, पिंकी लॉन बॉल्स, ऐश्वर्या प्रतापसिंह तोमर शूटिंग, ईशा सिंग शूटिंग, हरिंदर पाल सिंग स्क्वॉश, अहिका मुखर्जी टेबल टेनिस, सुनील कुमार कुस्ती, अंतिम कुस्ती, रोशिबिना देवी वुशू, शीतल देवी पॅरा धनुर्विद्या, अजय कुमार अंध क्रिकेट, प्राची यादव पॅरा कॅनोइंग यांना जाहीर झाला आहे. हे सर्व पुरस्कार ९ जानेवारी रोजी दिले जाणार आहेत.



### कर्मवीर विद्यापीठाच्या ओजसला अर्जून पुरस्कार

**सातारा** : येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा



येथील विद्यार्थी ओजस प्रवीण देवतळे यास तिरंदाजीमधील अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे. ओजसचे हे यश कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा व रयत शिक्षण संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे, असे मत विद्यापीठाचे कुलाधिकारी चंद्रकांत दळवी व विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय कुंभार यांनी व्यक्त केले.

# राष्ट्रीय प्रो कराटे चॅम्पियनशिपमध्ये महाडमधील मुलांचे सुयश

**महाड : प्रतिनिधी**

डोंबिवली येथे राष्ट्रीय प्रो कराटे चॅम्पियनशिप ही स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत चॅम्पियन्स कराटे क्लब महाडच्या खेळाडूंनी सहभाग घेत १७ सुवर्ण, १६ रौप्य व १३ कांस्यपदकांची कमाई केली.



या स्पर्धेत तेजस्वी वाळंज हिने कुमिते व काता या दोन्ही प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले, तसेच कुमिते म्हादे चॅम्पियन ऑफ चॅम्पियन होऊन दोन हजार कॅश प्राईस प्राप्त केली. पारस पाटील यांने कुमते व काता या दोन्ही स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले तसेच स्वरा गोधरी हिने, अभिनील राजभोज (सुवर्ण व रौप्य), आदर्श गायकवाड (कांस्य), किमया कुंटे (सुवर्ण, कांस्य), वैष्णवी गोडबोले (रौप्य), आर्यन मोरे, विराज नरवाडे (सुवर्ण, रौप्य), जिजा जोशी, खुशी वर्तक (सुवर्ण, कांस्य), प्रेकक्षा पवार (सुवर्ण), अर्सलान खान (सुवर्ण, कांस्य), ओम निकम (सुवर्ण), अर्पिता पवार (सुवर्ण, रौप्य), यश सरवी (रौप्य, कांस्य), तृप्ती खडेकर (रौप्य), भावार्थ भाईदे, सान्वी पवार (कांस्य, रौप्य), अपुब पोरेल (कांस्य), प्रांजल पवार (रौप्य), श्रेयश जाधव (रौप्य, कांस्य), वंश लोखोटिया (रौप्य), धर्मराज सिंग, नैतिक शेडगे, समर्थ निकम यांने, आराध्य सुभे (कांस्य, रौप्य), शिवम पाटील व श्रेया जाधव (कांस्य) पदके पटकावून यश संपादन केले. चॅम्पियन्स कराटे क्लब महाडच्या या पदकविजेत्या खेळाडूंवर सध्या अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गुजरातला मिळाली हार्दिकची रिप्लेसमेंट

## अजमतुल्लाह ओमरजई या अष्टपैलू खेळाडूचा समावेश

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२४ आधीच हार्दिक पांड्याने पुन्हा एकदा मुंबईच्या ताफ्यात जायचा निर्णय घेतला. गुजरात संघाने हार्दिक पांड्याची कमी भरून काढण्यासाठी अष्टपैलू अजमतुल्लाह ओमरजई याला आपल्या ताफ्यात घेतले. हार्दिक पांड्याप्रमाणे तो फटकेबाजी करू शकतो, त्याशिवाय गोलंदाजीही करण्यास तो तरबेज आहे.

अजमतुल्लाह ओमरजई याला गुजरातने ५० लाख रुपयात गुजरातने घेतले. अजमतुल्लाह ओमरजई याची मूळ किंमत ५० लाख रुपये इतकीच आहे. नुकत्याच झालेल्या विश्वचषकात अजमतुल्लाह ओमरजई याने प्रभावी कामगिरी केली होती. त्याने फलंदाजी आणि गोलंदाजीत महत्वाची भूमिका बजावली होती. अजमतुल्लाह ओमरजई याच्यावर यंदाच्या लिलावात मोठी बोली लागेल, असा तर्क सर्वांनी व्यक्त केला होता, पण अजमतुल्लाह ओमरजई याच्यावर इतर संघाने विश्वास दाखवला नाही. गुजरात संघाने त्याला मूळ किंमतीमध्ये खरेदी केले.



अझमतुल्ला उमरझाईची आतापर्यंतची कामगिरी पाहिली शानदार राहिली आहे. त्याने २२ एकदिवसीय सामने खेळले आहेत. यात त्याने ४ अर्धशतकांसह ४९० धावा केल्या. यासोबतच १३ विकेट्सही घेतल्या आहेत. ओमरझाईने २४ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ११ विकेट घेतल्या आहेत. याशिवाय देशांतर्गत सामन्यांमध्येही त्याने चांगली कामगिरी केली आहे.

# दक्षिण आफ्रिकेचा भारतावर आठ गडी राखून विजय

## मालिकेत १-१ ने साधली बरोबरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना मंगळवारी (दि. १९)पार पडला. गकबेराह येथील सेंट जॉर्ज पार्क येथे झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारताचा गडी राखून पराभव केला. त्याचबरोबर तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ने बरोबरी साधली. या सामन्यात टोनी डी जॉर्जीने नाबाद शतक झळकावत दक्षिण आफ्रिकेच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

आफ्रिकेसाठी सलामी देणाऱ्या टोनी डी जॉर्जी आणि रीझा हेंड्रिक्स यांनी १३० धावांची भागीदारी केली, जी २८व्या षटकात हेंड्रिक्सच्या



विकेटने मोडली. अर्शदीप सिंगने भारताला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या रॅसी व्हॅन डर ड्युसेनने ५ चौकारांच्या मदतीने ३६ धावांची खेळी केली आणि टोनी डी जॉर्जीसोबत दुसऱ्या विकेटसाठी ७६ धावांची (८३ चेंडू) भागीदारी केली. विजयाच्या काही क्षण आधी ४२व्या षटकात रिंकू सिंगने भारतासाठी दुसरी विकेट घेतली.

या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करमने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना ४६.२ षटकांत २११ धावांवर गारद झाला होता. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २१२ धावांचे लक्ष्य मिळाले आहे. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिका संघाने टोनी डी जॉर्जीच्या शतकाच्या आणि रीझा हेंड्रिक्सच्या अर्धशतकाच्या जोरावर ४२.३ षटकांत २ गडी गमावून २१५ धावा करीत विजय नोंदवला. भारताकडून रिंकू सिंग आणि अर्शदीप सिंगने प्रत्येकी एक विकेट घेतली.

भारताकडून साई सुदर्शनने ६२ आणि कर्णधार राहुलने ५६ धावांचे योगदान दिले. या दोघांशिवाय भारताचा एकही फलंदाज विशेष काही करू शकला नाही. त्यामुळे टीम इंडियाला पूर्ण ५० षटकेही खेळता आली नाहीत. आफ्रिकन संघाकडून नांद्रे बर्जरने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. हेंड्रिक्स आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. विल्यम्स-मार्करम यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

# पॅरा खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राला पाचवे स्थान



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय क्रीडा मंत्रालय आणि साई यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या पहिल्या पॅरा खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राने १२ सुवर्ण, सात रौप्य आणि १६ कांस्यपदकांसह पाचवे स्थान मिळविले. स्पर्धेत अखेरच्या दिवशी महाराष्ट्राला दत्तप्रसाद चौगुले आणि विश्व तांबे यांनी टेबल टेनिस प्रकारात सुवर्णपदकांची कमाई करून दिली. महिला विभागात पृथ्वी बर्वेला रौप्यपदकाची मानकरी ठरली. नेमबाजीत महाराष्ट्र संघाला सर्वसाधारण उपविजेतेपद मिळाले.

स्पर्धेत हरियाणा ४० सुवर्ण, ३९ रौप्य आणि २६ कांस्य अशा १०५ पदकांसह आघाडीवर राहिले. उत्तर प्रदेशने ६२, तामिळनाडूने ४२, तर गुजरातने ५७ पदकांसह अनुक्रमे दुसरे, तिसरे आणि चौथे स्थान पटकावले.

टेबल टेनिस प्रकारात महाराष्ट्राच्या दत्तप्रसाद चौगुले आणि विश्व तांबे यांनी सुवर्णपदकाची कमाई केली. पृथ्वी बर्वेला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. पुरुषांच्या क्लास ९ प्रकारात दत्तप्रसदाने हरियाणाच्या रविंदर यादवचे तगडे आव्हान ११-३, ११-८, ९-११, १२-१० असे परतवून लावले. क्लास १० प्रकारात विश्वने तेलंगणाच्या हितेश दलवाणीचा कडव्या संघर्षानंतर पाच गेमपर्यंत रंगलेल्या लढतीत ११-७, ६-११, १३-११, १६-१८, ११-८ असा पराभव केला. दोन गेमची बरोबरी झाल्यावर निर्णायक पाचव्या गेमला विश्वने एकाग्रतेने खेळ करताना एकतर्फी विजय मिळवून सुवर्णपदकावर नाव कोरले. महिलांच्या क्लास ९-१० प्रकारात पृथ्वीला तामिळनाडूच्या बेबी सहानाचा प्रतिकार करता आला नाही. बेबीने सरळ तीन गेममध्ये ११-३, ११-६ आणि ११-३ असा विजय मिळविला.

नेमबाजी क्रीडा प्रकारात महाराष्ट्राने पदार्पणातच उपविजेतेपदाचा मान मिळविला. स्वरुप उन्हाळकर आणि वैभवराजे रणदिवे यांच्या महाराष्ट्राच्या विजयात मोलाचा वाटा होता. कोल्हापूरच्या स्वरुपने पुरुषांच्या १० मीटर एअकर रायफल एसएच १ प्रकारात सुवर्ण, तर वैभवने १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात एसएच १ प्रकारातच कांस्यपदक मिळविले. महाराष्ट्राच्या या यशाबद्दल प्रशिक्षक अनुराधा खुडे यांनी समाधान व्यक्त केले.

## प्रल्हाद नलावडे स्मृती मोफत शालेय कॅरम स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

कॅरमप्रेमी स्व. प्रल्हाद नलावडे यांच्या तृतीय स्मृतीदिनानिमित्त १५ वर्षांखालील शालेय मुलांमुलींची विनाशुल्क एकेरी कॅरम स्पर्धा ३१ डिसेंबर रोजी आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे आयोजित करण्यात आली आहे.



श्री नारायण गुरु कॉलेज ऑफ कॉमर्स-चेंबूर व अविनाश स्पोर्ट्स यांच्या सहकार्याने होणाऱ्या कॅरम स्पर्धेतील पहिल्या १६ विजेत्या-उपविजेत्यांना स्ट्रायकरसह पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार असल्याची माहिती आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते यांनी दिली.

श्री नारायण गुरु कॉलेज-चेंबूर पश्चिम येथे होणाऱ्या स्पर्धेतील सहभागी उदयोन्मुख खेळाडूंना तज्ज्ञ तसेच क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. इच्छुक शालेय १५ वर्षांखालील मुलांमुलींनी मोफत प्रवेशासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा क्रीडाशिक्षक अविनाश महाडिक (९००४७५४५०७) यांच्याकडे २२ डिसेंबरपर्यंत संपर्क साधावा.

# रोहित शर्माच्या उपस्थितीबद्दल आकाश अंबानीचे सूचक वक्तव्य

**दुबई : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२४च्या लिलावापर्यंत मुंबई इंडियन्स संघ चर्चेत होता. हार्दिक लिलावापूर्वी गुजरात टायटन्समधून मुंबई इंडियन्समध्ये गेला आणि कर्णधार म्हणून त्याच्या नियुक्तीमुळे रोहितचा कर्णधार म्हणून १० वर्षांचा कार्यकाळ संपला. लिलावादरम्यान एका चाहत्याने रोहित आणि फ्रेंचायझीच्या योजनांबद्दल विचारले, त्यावर एमआयचे मालक आकाश अंबानी यांनी सूचक वक्तव्य केले. याची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे.

फ्रँचायझीने सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या व्हिडीओनुसार आकाशने चाहत्याला सांगितले, काळजी करू नका, तो फलंदाजी करेल. दरम्यान, ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कला कोलकाता नाईट रायडर्सने २४.७५ कोटी रुपयांना विकत घेतले, तर त्याचा सहकारी कर्णधार पॅट कमिन्सला सनरायझर्स हैदराबादने दुबईतील इंडियन प्रीमियर लीग लिलावात २०.५० कोटी रुपयांना विकत घेतले. मंगळवारी झालेल्या



लिलावात याची बोली लावण्यात आली.

पत्रकारांशी संवाद साधताना एका व्यक्तीने थेट रोहित शर्माबद्दल प्रश्न विचारला आणि तो व्यक्ती म्हणाला, रोहितला कर्णधार म्हणून परत आणा. त्या व्यक्तीचा प्रश्न ऐकून आकाश अंबानीने प्रतिक्रिया दिली. चिंता करू नका, संघात तो फलंदाजी करायला नक्की येईल. या घटनेचा व्हिडिओ मुंबई इंडियन्सने सोशल मीडियावर शेअर केला आहे, ज्यावर चाहत्यांकडून अनेक कमेंट्स येत आहेत.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात जिमखाना विभागातर्फे २१ व २२ डिसेंबर या दोन दिवसांमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा होणार आहेत.

या वार्षिक क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटनासाठी महाविद्यालयाचे सीडीसी मेंबर प्रभाकर जोशी व राष्ट्रीय कबड्डीपटू सुवर्णा कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित



राहणार आहेत. या दोन दिवसांमध्ये रनिंग, गोळा फेक, कबड्डी, खो-खो, बुद्धिबळ, रस्सीखेच, कॅरम, रिले, कुस्ती असा वेगवेगळ्या स्पर्धा महाविद्यालयातील वाणिज्य व शास्त्र शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी आयोजित केल्या आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील वाणिज्य व शास्त्र शाखेतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना या सर्व स्पर्धांमध्ये भाग घेण्याचे आवाहन केले आहे.

या स्पर्धांचे आयोजन प्रा. प्रथमेश उदेकर, जिमखाना प्रमुख तसेच अजिंक्य भगत फिजिकल डायरेक्टर यांनी केले आहे, तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. तनुजा सुमन व इतर सर्व सदस्य या सर्व वार्षिक क्रीडा स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत आहेत.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com